# परीक्षा सुधारणा विधेयकावर लोकसभेत चर्चा



**नवी दिल्ली** : लोकसभेत सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांच्या प्रतिबंधासाठी) सुधारणा विधेयक २०२६वर मंगळवारी (दि.२८) चर्चा सुरू झाली असून यावेळी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी हे विधेयक देशातील विद्यार्थी आणि तरुणांच्या हिताचे संरक्षण करणारे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे म्हटले आहे. त्यांनी सांगितले की, या सुधारणा विधेयकामुळे सरकारची विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत असलेली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित होते. ना. जितेंद्र सिंह यांनी पुढे म्हटले की, काल सादर करण्यात आलेले हे विधेयक प्रत्यक्षात सार्वजनिक परीक्षा अनुचित साधन प्रतिबंध कायदा २०२४मधील सुधारणा आहे. हा कायदादेखील याच सरकारने आणला होता. स्वतंत्र भारताच्या इतिहासात सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी अशा प्रकारचा कायदा प्रथमच करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक १२
www.ramprahar.com

◆ बुधवार, २९ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मच्छीमारांना सॅटेलाईट फोनचे वितरण/२
पनवेल मनपासाठी स्वतंत्र क्षयरोग नियंत्रण कार्यालय/३
नाशिकच्या सर्वेश कुशारेला उंच उडीत रौप्यपदक/८

# नैना विकासाला मोठी चालना

शेतकरी हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून टाऊन प्लॅनिंगला गती

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

नैना (नवी मुंबई एअरपोर्ट इंफ्लूएन्स नोटीफाईड एरिया) विकासाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सोमवारी (दि.२७) महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नैना परिसरातील गावांच्या विकासासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

नैना क्षेत्रातील गावांच्या नगर रचना योजनांना तातडीने मंजुरी द्यावी तसेच मंजूर असलेल्या योजनांमधील त्रुटी दूर करून ग्रामस्थांना मालमत्ता कार्डाचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल, सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून नैना क्षेत्रातील नगर रचना योजना प्रलंबित आहेत. मंजूर केलेल्या योजनांमध्ये त्रुटी असल्याचे नागरिक व लोकप्रतिनिधींचे म्हणणे आहे. या संदर्भात प्रत्यक्ष स्थळावर जाऊन सर्वेक्षण करून त्रुटी दूर कराव्यात तसेच जमीन मोजणीसाठी आता शासनाने खासगी यंत्रणांना मंजुरी दिली आहे. त्यांच्यामार्फत या क्षेत्रातील जमिनींची मोजणी करावी. नैना क्षेत्रातील तसेच विविध महानगर प्राधिकरणाच्या क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा, वाहतूक, पार्किंग, रस्ते, विकास आराखडा आणि पायाभूत सुविधांचा एकत्रित विचार करून नियोजन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

नैना परिसरातील टाऊन प्लॅनिंगच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देत मंजूर आराखड्यातील त्रुटी दूर करून विकास प्रक्रियेला वेग देण्यावर



मुख्यमंत्र्यांनी भर दिला तसेच स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून प्रत्यक्ष स्थळपाहणी, अचूक सर्वेक्षण आणि आवश्यक दुरूस्ती करून नियोजन पूर्ण करण्यात यावे, असे त्यांनी सूचित केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामस्थांच्या मालकी हक्कांचा पूर्ण आदर राखत जमिनींचे वाटप आणि विकास प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याची सूचना केली. भविष्यात नैना परिसरात मोठ्या प्रमाणावर शहरी विकास होणार असल्याने जलपुरवठ्याचे नियोजन आतापासूनच करण्यात यावे, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीत नैना परिसरातील जमिनींच्या अचूक मोजणीसाठी खासगी एजन्सींना मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढती लोकसंख्या, रस्ते, जलवाहिन्या, सार्वजनिक सुविधा, उद्याने आणि इतर विकासकामांचा विचार करून सविस्तर नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्णयांमुळे तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती मिळणार असून नैना परिसरातील गावांमध्ये नियोजित नागरी विकास, पायाभूत सुविधा आणि ग्रामस्थांच्या मालकी हक्कांना अधिक बळ मिळणार आहे.

## प्रथम शेतकरी, नंतर प्रकल्प भूमिकेवर मुख्यमंत्र्यांची मोहोर

नैना अंतर्गत सर्व क्षेत्रांतील शेतकऱ्यांच्या हरकतींवर प्रथम शेतकरी, नंतर प्रकल्प या भूमिकेच्या धर्तीवर तातडीने सकारात्मक निर्णय व्हावा तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लागावेत यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा यांच्या उपस्थितीत झालेल्या मागील बैठकीत प्रशासकीय स्तरावर सकारात्मक चर्चा झाली. त्यावेळी नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना) अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या सर्व टाऊन प्लॅनिंग (टीपी) योजनांमधील शेतकऱ्यांच्या हरकतींवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते तसेच नैना क्षेत्रातील गावांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावून विकासकामांना गती द्यावी, पात्र शेतकऱ्यांना प्रॉपर्टी कार्डांचे वितरण करावे आणि गावांसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या सामाजिक सुविधांचा सविस्तर आराखडा लवकरात लवकर सादर करावा, असे स्पष्ट आदेशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

या सर्व प्रक्रियेला सोमवारी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम मान्यता देत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यामुळे 'प्रथम शेतकरी, नंतर प्रकल्प' या भूमिकेला प्रत्यक्षात बळ मिळाले असून नैना परिसरातील शेतकरी व प्रकल्पग्रस्तांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीला गती मिळणार आहे.

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२८) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी, न्याय, ग्रामविकास, रेल्वे विकास आणि महसूल विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून कृषी क्षेत्राला चालना देण्यापासून ते विशेष न्यायालयांची स्थापना आणि अवैध गौण खनिज उत्खननावरील कारवाई अधिक कठोर करण्यापर्यंत अनेक महत्त्वाचे निर्णय यावेळी घेण्यात आले.

राज्याच्या महाॲग्री-एआय धोरणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नाविन्यता केंद्राच्या कार्यालयात व्यवस्थापकीय संचालक पदाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यास मदत होणार आहे. मादक द्रव्ये आणि मादक पदार्थ अधिनियम अंतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, तर सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास तसेच त्यासाठी आवश्यक पदांना मंजुरी देण्यात आली. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेड आणि यवतमाळ येथे अनन्य विशेष न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) कंपनीचे अधिकृत समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून थेट ५०० कोटी रुपयांपर्यंत, तर भरणा केलेले समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून २२५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे मुंबईतील रेल्वे पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांना वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७)मध्ये सुधारणा करत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर स्वामित्वधनाच्या दहापट दंडाची तरतूद करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.



### जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना दिलासा देणारा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर पार पडलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना आता निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणार आहे.

## निवडक

### नागपूरमध्ये पूरसदृश परिस्थिती; आज शाळा-महाविद्यालयांना सुट्टी

**नागपूर** : राज्याची उपराजधानी नागपूरला पावसाने झोडपून काढले. मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, हवामान विभागाने नागपूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट दिला आहे. त्यामुळे या भागांतील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सर्व अंगणवाडी, शाळा, महाविद्यालयांना बुधवारी (दि.२९) सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

### नाशिक आणि पालघरमध्ये जाणवले भूकंपाचे धक्के

**नाशिक, पालघर** : नाशिकमध्ये मंगळवारी (दि.२८) सलग दुसऱ्या दिवशी भूकंपाचे हादरे जाणवले. सुरगाण्यातील बोरगाव परिसरात दुपारी ३ वाजून २७ मिनिटांनी भूकंपाचा धक्का बसला. आठवडाभरात पाच ते सातवेळा भूकंप आल्याने ग्रामस्थ धास्तावले आहेत, तर कुंभमेळा प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून त्र्यंबकेश्वरमध्ये विशेष भूकंप मापन केंद्र उभारण्यात येणार आहे. दुसरीकडे पालघर जिल्ह्यातही भूकंपाचे धक्के जाणवले. पालघरमधील धुंदलवाडी, आंबोली, कासा परिसर भूकंपाच्या धक्क्याने हादरला.

# खोपोलीच्या झेनिथ धबधबा परिसरात अडकलेल्या ७० पर्यटकांची सुखरूप सुटका



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहर व परिसराला मंगळवारी (दि.२८) ढगफुटीसदृश्य पावसाने झोडपून काढले. अशातच सुमारे ७० हौशी पर्यटक येथील झेनिथ धबधब्यावर बंदी असतानाही आले होते, जे ओढ्याचे पाणी मोठ्या प्रमाणात वाढल्याने अडकले. अखेर त्यांची सुखरूप सुटका करण्यात आली.

प्रशासनाने धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यासाठी बंदीचे आदेश घेतले असतानाही काही पर्यटक आपला जीव धोक्यात घालून त्या ठिकाणी जात असतात. अशाच प्रकारे ७० पर्यटक खोपोली येथील झेनिथ धबधब्यावर गेले होते. परतीच्या प्रवासात ओढ्याचे पाणी वाढल्याने हे पर्यटक अडकले. यामध्ये तरुण, तरुणींसह लहान मुले, महिलांचाही समावेश होता.

या घटनेची माहिती मिळताच हेल्प फौंडेशन, अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पर्यटकांना धीर दिला. काही वेळात पावसाने विश्रांती घेतल्याने नाल्याचा प्रवाह कमी झाला. त्यानंतर अडकलेल्या सर्व पर्यटकांना दोरीच्या सहाय्याने सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

# सीईटी परीक्षेत कोणताही घोटाळा नाही!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील एमएचटी-सीईटी परीक्षेत महाघोटाळा झाल्याचे दावे विरोधकांकडून केले जात आहेत, मात्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. सीईटी परीक्षेत कोणताही घोटाळा झालेला नसून सोशल मीडियावर केले जाणारे दावे दिशाभूल करणारे आणि तथ्यहीन आहेत, असे स्पष्टीकरण सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी दिले आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एका शिक्षकाचा व्हिडिओ शेअर करत एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या व्हिडीओमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये भ्रमाचे



आयुक्तांचे स्पष्टीकरण

वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सीईटी सेलकडून अधिकृत भूमिका मांडण्यात आली. या प्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून पोलीस व सायबर विभागाकडे सखोल चौकशीची मागणी करण्यात आल्याचेही आयुक्त सरदेसाई यांनी सांगितले.

"काही विद्यार्थी बारावी बोर्डाच्या परीक्षेपेक्षा सीईटी परीक्षेला अधिक प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांना बोर्डाच्या तुलनेत सीईटीत जास्त गुण मिळतात. दोन वेगवेगळ्या परीक्षांच्या कामगिरीची एकमेकांशी तुलना करणे अयोग्य आहे," असे सांगून आयुक्त सरदेसाई म्हणाले की, टक्केवारी (पर्सेंटेज) आणि पर्सेंटाईल या दोन पूर्णपणे भिन्न पद्धती आहेत. पर्सेंटाईल पद्धत ही संबंधित बॅचपुरती मर्यादित असते. त्या बॅचमध्ये जो सर्वाधिक गुण मिळवतो, तो 'टॉपर' ठरतो आणि त्याला १०० पर्सेंटाईल दिले जातात. मग त्याचा मूळ स्कोअर (रॉ स्कोअर) ७०, ८० किंवा ९० काहीही असो. १०० पर्सेंटाईलचा अर्थ १०० टक्के गुण असा होत नाही.

### अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध पोलिसांत तक्रार

एमएचटी-सीईटी परीक्षेतील कथित अनियमिततेबाबत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांचे अंतर्गत विश्लेषण केले जाणार असून त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, या अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध आणि चुकीची माहिती देणाऱ्यांविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली असून सायबर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# रायगडात ६६ टक्के पावसाची नोंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वार्षिक पर्जन्यमानाच्या ६६ टक्के पाऊस झाला आहे. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत तीन हजार १४८ मिलीमीटर पाऊस पडतो. आतापर्यंत पावसाने सरासरी दोन हजार मिमीचा टप्पा ओलांडला आहे.

रायगडात जून आणि जुलै या दोन महिन्यात दोन हजार ०९७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. उरण येथे वार्षिक सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत १०७ टक्के पाऊस पडला असून श्रीवर्धन येथे सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत सर्वात कमी ६१ टक्के पाऊस झाला आहे. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ६५५ मिमी पाऊस पडतो. त्या तुलनेत यावर्षी ३३५ मिमी पाऊस पडला. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत ५१ टक्के पाऊस पडला. जुलै महिन्यात सरासरी एक हजार २०० मिमी पाऊस पडतो. २८ जुलैला सकाळी आठ वाजेपर्यंत एक हजार ७४५ मिमी पाऊस पडला. जुलै महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत जिल्ह्यात १६१ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जून महिन्यातील पावसाची तूट जुलै महिन्यात भरून निघाली आहे.



### धरणांमध्ये ९५ टक्के पाणीसाठा

दमदार पावसामुळे जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. हेटवणे मध्यम प्रकल्पात ९१.५० टक्के पाणीसाठा जमा झाला आहे, तर लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २८ प्रकल्पांपैकी २३ प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. त्यामुळे धरणांमध्ये ९५ टक्के पाणीसाठा झाला आहे. उर्वरित पाच प्रकल्पही लवकरच भरण्याची शक्यता आहे. पावसाचे अजून दोन महिने शिल्लक आहेत. त्यामुळे पाऊस यंदाही सरासरी ओलांडेल अशी अपेक्षा वर्तवली जात आहे.

## सोनम वांगचुक यांनी टोचले सीजेपी कार्यकर्त्यांचे कान!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) सौरव दाससहित इतर कार्यकर्त्यांनी तुफान डान्स केला. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी टीका केली होती. यावर शैक्षणिक सुधारणांसाठी उपोषण करणारे सोनम वांगचुक यांनीही तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना वांगचूक म्हणाले की, कुठलाही विजय हा विनम्रतेने स्वीकारला पाहिजे. सर्वांनी गरिमा, संयम आणि जबाबदारी विजय साजरा केला पाहिजे. यश मिळवण्याइतकंच सन्मान आणि विनम्रता कायम ठेवणेही आवश्यक असते.

दरम्यान, आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या काही जणांनी हा जल्लोष असंवेदनशील असल्याचे म्हटले आहे, कारण आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूमुळे हे आंदोलन उभे राहिले होते तसेच काही राज्यांमध्ये कायदेशीर प्रक्रिया सुरू असताना अशा प्रकारे जल्लोष करणे योग्य नसल्याचेही अनेकांनी नमूद केले आहे.

# सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील द बीकन ऑफ लीडरशिप अवॉर्डने सन्मानित

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे (अधिकारप्रदत्त स्वायत्त) प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांना शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल द बीकन ऑफ लीडरशिप अवॉर्ड २०२६ नुकताच प्रदान करण्यात आला. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



प्राचार्य डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात प्रगती साधली आहे. महाविद्यालयाला नॅक गुणवत्ता-मूल्यांकनात ए++ तसेच अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जादेखील प्राप्त झाला आहे. याशिवाय महाविद्यालयाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करून आधुनिक कौशल्याधिष्ठित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

नेरूळ येथील डी.वाय. पाटील विद्यापीठात वन वर्ल्ड वूमेन नेटवकच्या वतीने आयोजित फियरलेस लीडरशिप या उपक्रमाच्या दुसऱ्या पर्वात भारताचे राजदूत डॉ. दीपक व्होरा यांच्या हस्ते तसेच डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या उपाध्यक्ष व प्रो-चॅन्सलर डॉ. शिवानी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. पाटील यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. (पान २ वर..)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मच्छीमारांना सॅटेलाईट फोनचे वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या मच्छिमारांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत मच्छिमारांना अत्याधुनिक सॅटेलाइट फोन उपलब्ध करून देण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय विभाग आणि बीएसएनएल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेतून या योजनेचा आरंभ मंत्रालयात करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात पाच मच्छिमारांना सॅटेलाइट फोनचे वितरण करण्यात आले. या फोनद्वारे इनकमिंग आणि आउटगोइंग अशा दोन्ही प्रकारच्या संपर्काची सुविधा उपलब्ध आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे म्हणाले, "राज्यातील मच्छिमारांचे प्राण आणि उपजीविका सुरक्षित ठेवणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. खोल समुद्रात मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत सॅटेलाईट फोन सुविधा मच्छिमारांसाठी जीवनदायी संपर्क व्यवस्था ठरेल.

'बीएसएनएल'च्या सहकार्याने ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक असून, यामुळे समुद्रातील सुरक्षा, बचावकार्य आणि संप्रेषण अधिक प्रभावी होईल." या तंत्रज्ञानामुळे मोबाईल नेटवर्क नसलेल्या भागातही संपर्क साधणे शक्य होणार असून, खराब हवामान, यांत्रिक बिघाड, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा इतर संकटांच्या वेळी तात्काळ मदत मागविणे सुलभ होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

सॅटेलाईट फोन सुविधेमुळे मत्स्य नौकांचा किनाऱ्याशी सातत्यपूर्ण संपर्क राहणार असल्याने शोध व बचाव मोहिमांना अधिक वेग मिळेल. हवामानातील बदल, समुद्री इशारे आणि सुरक्षा सूचना मच्छिमारांपर्यंत त्वरित पोहोचविणे शक्य होईल. परिणामी समुद्रातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यास आणि मच्छिमारांचे जीवित अधिक सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

## माथेरान-नेरळ घाटात अपघात; उल्हासनगरातील चार प्रवासी बचावले

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानला वर्षासहलीसाठी आलेल्या पर्यटकांची गाडी रस्त्याच्या खाली जाऊन अपघात झाला. या अपघातात वाहनचालक आणि अन्य तिघे असे चार प्रवासी थोडक्यात बचावले असून गाडी झाडाला जाऊन टेकल्याने हा अपघात थोडक्यात निभावला आहे.



उल्हासनगर येथील कुटुंब आपली ओरा गाडी घेऊन माथेरान येथे पर्यटन स्थळी पोहचले होते. दिवसभर माथेरान मध्ये पर्यटनाचा आणि धुकेमय पावसाचा आनंद घेऊन सायंकाळी आपल्या घरी परतण्यासाठी माथेरान येथून निघाले. माथेरान हा अवघड घाट त्या कुटुंबातील एक सदस्य आपली गाडी चालवत प्रवास करीत होते. त्यावेळी जुमापट्टी चे अलीकडे असलेली एस टर्न येथे त्यांची गाडी रस्त्याच्या खाली गेली. त्यावेळी येथील सिमेंट कठडे तोडून ही गाडी पलीकडील झाडावर जाऊ आढळली.

या अपघातात ते वाहन जर झाडाला अडकण्याऐवजी खाली गेले असतेतर मोठी जीवितहानी झाली असती. त्या गाडी मधून चार प्रवासी प्रवास करीत होते आणि त्या सर्वांचे प्राण त्या एका झाडाने वाचवले आहेत. या अपघातात गाडीला मोठे नुकसान झाले असून नेरळ पोलिस काही वेळातच अपघात स्थळी पोहचले आणि त्यामुळे जखमींना तत्काळ रुग्णालयात नेण्याची मदत पुरवली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही .

## रायगडातील महसूल संघटनांचे आंदोलन मागे

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर महसूल संघटनांनी आपले काम बंद आंदोलन मंगळवारी मागे घेतले. महसूल संघटनांच्या तिन्ही प्रमुख मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने हे आंदोलन मागे घेत असल्याचे महसूल आणि तलाठी संघटनांनी जाहीर केले. यानंतर सर्व कर्मचारी कामावर परतले.

पोयनाड पोलीस ठाण्यात दाखल एका गुन्ह्यात मंडळ अधिकाऱ्यांच्या अटकेमुळे रायगड जिल्ह्यात पोलीस विरूध्द महसूल प्रशासन अशी संघर्षाची ठिणगी पडली आहे. शनीवारी तलाठी संघाने काम बंद आंदोलनाची हाक दिली होती. सोमवारी महसूल विभागातील सर्व कर्मचारीही सहभागी झाले. जिल्हाधिकारी कार्यालया समोर एकत्र जमत सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली होती. या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासह तससिल आणि प्रांत कार्यालयांचे कामकाजही ठप्प झाले होते.


मंडळ अधिकारी रविदास जाधव यांना थेट अटक करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाकडून जाधव यांच्यावर झालेल्या बेकायदेशीर व थेट अटकेच्या कारवाईचा फेर विचार व्हावा, तलाठी सतिश भानुदास ढवळे यांना अटक करू नये, गुन्हयाचा तपास पोयनाड पोलीस ठाण्याकडून काढून घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा स्थानिक गुन्हे शाखा कडे वर्ग करण्यात यावा अशा मागण्या महसूल संघटनांकडून करण्यात आल्या होत्या.

या संदर्भात जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज महसूल संघटनांशी चर्चा केली. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास पोयनाड पोलीसांकडून स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असल्याचे त्यांनी संघटनांच्या प्रतिनिधींना सांगीतले. तसेच इतरही मागण्यांबाबत सकारात्मक पाऊले उचलली जातील अशी ग्वाही संघटनेच्या शिष्टमंडळाला दिली यानंतर आंदोलन मागे घेत असल्याचे महसूल संघटना आणि तलाठी संघटनांनी जाहीर केले.

## भेरव येथील अंबा नदी पूल पाण्याखाली; वाहतूक ठप्प

**पाली : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे सोमवारी (ता. २७) सायंकाळी भेरव येथील अंबा नदीचा पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला. पुलावरून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रवाह सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.



हा मार्ग खुरावले फाट्यावरून भेरव, वाघोशी, कुंभारघर, उद्धर, महागाव आणि इतर अनेक आदिवासी वाड्या-वस्त्यांना पाली-खोपोली महामार्गाशी जोडणारा मुख्य मार्ग आहे. पूल पाण्याखाली गेल्यामुळे या परिसरातील अनेक गावांचा संपर्क तुटला. शाळा-कॉलेजचे विद्यार्थी व प्रवासी वाहतूक ठप्प झाल्याने अडकून पडले.

हा पूल ६-७ दशके जुना असून सततच्या पुरामुळे जर्जर झाला आहे. या वर्षीच्या पुराच्या प्रवाहात पुलावरील कॉंक्रीट आणि सुरक्षेचे कठडे पूर्णपणे वाहून गेले आहेत. पुलाच्या लोखंडी सळया बाहेर आल्या असून मध्यभागी बाक आला आहे; तसेच दोन्ही बाजूंचे रस्ते खचले आहेत. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असणाऱ्या या धोकादायक पुलाचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून डागडुजी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## सीकेटी कॉलेजमध्ये कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल येथे रविवार २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. "कारगिल विजय दिवस" निमित्त प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी शहीदांना पुष्पहार अर्पण करून व मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली वाहिली. कारगिल युद्धातील शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी जेयुओ रोहित कालांतरे यांच्या नेतृत्वाखाली एन.सी.सी कॅडेट्सकडून शोक शस्त्र सादर करण्यात आले. कारगिल विजय दिवस या विषयावर एक भावनिक भाषण कॅडेट आदर्श दळवी, कॅडेट पूनम जाधव आणि कॅडेट अथर्व देसाई द्वारे सादर करण्यात आले.

यानंतर एनओ लेफ्टनंट डॉ. एन. पी. तिदार व प्रो.डॉ.एस.के.पाटील यांनी भारतीय सैन्याने देशाच्या रक्षणासाठी केलेल्या बलिदानावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना त्यांचे भविष्य जवान आणि अधिकाऱ्यांप्रमाणे घडवण्यासाठी मन, चेतना आणि विचार या मूलभूत तत्त्वांचा वापर करून त्यांचे अनुकरण करण्यास प्रवृत्त केले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य प्रो डॉ.एस.के पाटील, प्रो.डॉ.बी एस.पाटील, प्रो.डॉ.एस. बी.यादव, प्रो. डॉ. बी. डी. आघाव, सब लेफ्टनंट डॉ. पावरा, प्रा.व्यवहारे, प्रा.पाटील उपस्थित होते.

# खोपोली मार्केट परिसरात अनोखे पोस्टर आंदोलन

**खालापूर : प्रतिनिधी**

स्वच्छ खोपोली ही केवळ नगरपालिकेची जबाबदारी नसून ती आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकांने कचरा फक्त कचरा कुंडीतच टाकण्याची शिस्त लावून घेतली पाहिजे,असे प्रतिपादन खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी केले आहे.




खोपोली महात्मा फुले भाजी मंडईतील काही ठिकाणी कचरा थेट रस्त्यावर टाकला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. नगरपालिकेकडून या भागात नियमितपणे कचरा उचलला जात आहे मात्र, नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या निष्काळजीमुळे मुख्य रस्त्यांवर अस्वच्छता पसरत आहे. या पार्श्वभूमीवर, शहरातील जागरुक तरुण सनी जंगम यांनी एका सामाजिक जाणीवेतून हातात जनजागृतीचे पोस्टर घेवून दिवसभर मार्केट परिसरात नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला.

सनी जंगम यांनी हातात घेतलेल्या पोस्टरवरील संदेश प्रत्येकाला विचार करायला लावणारा होता. कचरा रस्त्यांवर टाकू नका. शहर तुमच्याकडून एवढीच अपेक्षा करते. अशा शब्दांत त्यांनी नागरिकांना आवाहन केले. त्याच वेळी,कचरा टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करा. शहर स्वच्छ ठेवा, दुर्गंधी पसरवणाऱ्यावर कडक कारवाई अशी ठाम मागणी करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी या सामाजिक उपक्रमाची दखल घेतली. स्वतः सनी जंगम यांची भेट घेऊन या समस्येवर सविस्तर चर्चा केली. समाजासाठी निस्वार्थपणेपुढाकार घेणाऱ्या या तरुणाचे कौतुकही केले.खोपोली मार्केट अधिक स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध करण्यासाठी प्रशासनाने आता कंबर कसली आहे.

याचाच एक भाग म्हणून बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी मार्केटमधील व्यापारी वर्गांची एक महत्त्वाची बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकींत अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासह स्वच्छतेसंदर्भात अनेक ठोस आणि योग्य निर्णय घेतले जाणार आहेत.

जनजागृती मोहीम आणि चर्चेच्या प्रसंगी नगरसेवक अविनाश किरवे, उद्योजक श्समीर साठे, सामाजिक कार्यकर्त निखिल पोल, यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी उपस्थित होते.

## आज कोपरखैरणे येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे अद्वितीयत्व असलेल्या गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व समाजापर्यंत पोचवावे, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने कोपरखैरणे येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ जुलै या दिवशी सायंकाळी ६ वाजता कै.अण्णासाहेब पाटील मेमोरियल हॉल, सेक्टर ५ येथे हा कार्यक्रम होणार आहे. तसेच नवीन पनवेल सेक्टर १ येथील श्री बँक्वेटस हॉल मध्ये संध्याकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

'अमेरिका-इराण युद्धा' ची झळ भारतियांना अल्पाधिक प्रमाणात बसत आहे. भारतातील आतंकवाद, नक्षलवाद आदी समस्यांमध्ये 'कार्पोरेट जिहाद', 'जैविक जिहाद' या सारख्या नव्या संकटांची भर पडली आहे. या संकटाला कसे सामोरे जायचे याचे उत्तर भारताचे अद्वितीयत्व असलेल्या गुरु-शिष्य परंपरेने आधीच देऊन ठेवले आहे. ते समाजापर्यंत पोचवावे, यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला आहे.

या महोत्सवात श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन), सनातन संस्था आणि संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे कार्य यावर लघुपट, धर्मरक्षक आणि हिंदुनिष्ठ यांचे सत्कार, राष्ट्रभक्त अन् धर्मनिष्ठ मान्यवरांचे मार्गदर्शन, स्वसंरक्षणाच्या सोप्या पद्धतींची प्रात्यक्षिके, रामराज्याच्या स्थापनेसाठीचा संकल्प आणि नामजप, तसेच 'रामराज्य अर्थात हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठीचा संघर्ष आणि दिशा' या विषयांवरही मान्यवर वयांचे विशेष मार्गदर्शन होणार आहे. या महोत्सवात ग्रंथप्रदर्शन, तसेच राष्ट्र-धर्म विषयक फलकप्रदर्शनही लावण्यात येणार आहे. सर्वांनी या अमूल्य पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यासह देशभरात ८१ ठिकाणी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

## तळोजा येथे विश्व हिंदू परिषदेच्या बालसंस्कार केंद्रात गुरुपौर्णिमा साजरी

**नवीन पनवेल :** विश्व हिंदू परिषद, मातृशक्ती आयाम, तळोजा प्रखंड यांच्या वतीने श्री लोकनाथ शिव मंदिर, सेक्टर-४, तळोजा येथे गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त बालसंस्कार केंद्रात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.



या निमित्ताने श्लोक वाचन स्पर्धा तसेच गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी धन्यवाद कार्ड निर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात आली. बालसंस्कार केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मुलांनी सादर केलेले श्लोक व स्वतः तयार केलेली आकर्षक धन्यवाद कार्ड उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्व हिंदू परिषद, तळोजा प्रखंड तसेच बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी नियोजन व व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.

यावेळी प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन मीनाक्षी अग्रवाल, कुलाबा जिल्हा मातृशक्ती संयोजिका यांनी दिले. यावेळी तळोजा प्रखंड मातृशक्ती व बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मधुरीमा सिंग, तळोजा प्रखंड मातृशक्ती संयोजिका, प्रशांत सावंत प्रखंड मंत्री, रुपेश केणी, बजरंग दल संयोजक प्रियांका शर्मा, तेजश्री केणी, हेमा साहू, नम्रता सिंह उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पालक, विद्यार्थी व कार्यकर्त्यांचे उपस्थिती व सहकार्याबद्दल आभार मानण्यात आले.

पान १ वरुन

## सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील द बीकन ऑफ लीडरशिप अवॉर्डने सन्मानित

प्राचार्य डॉ. पाटील यांच्या कुशल, दूरदृष्टीपूर्ण आणि परिवर्तनवादी नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, कौशल्याधारित शिक्षण, विद्यार्थी विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि सामाजिक बांधिलकी या क्षेत्रांत प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने वाढ, शिक्षकांना पाठबळ आणि त्यांचे सक्षमीकरण, नवनवीन उपक्रमांना प्रोत्साहन आणि सर्वसमावेशक, भविष्याभिमुख शैक्षणिक वातावरणाची निर्मिती या त्यांच्या कार्याची विशेष दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे वन वर्ल्ड वूमेन नेटवर्क आणि सीकेटी महाविद्यालय यांच्यातील शैक्षणिक सहकार्याचा हा दुसरा यशस्वी टप्पा ठरला. यापूर्वीच्या पर्वालाही मोठे यश लाभले होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये संस्थापक अंशुल शर्मा आणि त्यांच्या संपूर्ण आयोजन समितीने महत्त्वाची भूमिका बजावली. यात सीकेटी महाविद्यालयाने अकॅडमिक पार्टनर म्हणून सक्रिय सहभाग नोंदविला. महाविद्यालयातील ४४ विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधी मंडळाने त्यामध्ये एनसीसीचे कॅडेट्स तसेच प्लेसमेंट सेलच्या सक्षम विद्यार्थी क्लबच्या सदस्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, या पुरस्काराबद्दल प्राचार्य डॉ. पाटील यांचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे यांनीही अभिनंदन केले आहे.



## पनवेलमध्ये श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील गावदेवी पाडा परिसरातील श्री स्वामी समर्थ मठ येथे गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून बुधवारी (दि. २९) विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्सव साजरा होणार आहे. यानिमित्ताने स्वामीभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

उत्सवानिमित्त पहाटे ५ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पूजन, आरती, नामस्मरण, प्रवचन व इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून महाप्रसाद आगरी समाज हॉल, पनवेल येथे होणार आहे.या सोहळ्यास गुरुवर्य मठाधीपती परमपूज्य श्री श्री १०८ श्री महंत सुधाकरदासजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## पनवेलमध्ये साई नारायणबाबा आश्रमात गुरुपौर्णिमा उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील स्टेशन रोडवरील श्री साई नारायण बाबा आश्रम आणि श्री साईबाबा मंदिरात बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी श्री गुरु पौर्णिमा उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात देशभरातील साईभक्त सहभागी होणार असून, दिवसभर विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

परमपूज्य सद्गुरू श्री साई नारायणबाबा यांच्या पावन सान्निध्यात हा उत्सव पार पडणार असून, यामध्ये अभिषेक, मंत्रोपदेश, महाचरण पूजा आणि महाप्रसाद यांसारखे धार्मिक विधी संपन्न होणार आहेत. गुरु पौर्णिमेनिमित्त गुरूचरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि सद्गुरूंचे आशीर्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. उत्सवानिमित्त आश्रमात येणाऱ्या प्रत्येक साईभक्ताला 'साईरक्षा' भेट देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. तसेच श्री साईबाबा आणि श्री साई नारायण बाबा यांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### ताईबाई ठाकूर



**उरण :** तालुक्यातील कंठवली गावच्या सामाजिक कार्यकर्त्या ताईबाई महादेव ठाकूर (७२)यांचे नुकतीच आकस्मिक निधन झाले आहे .उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते बी.एम.ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत्या.त्यांच्या मागे त्यांचे पती, तीन मुलगे, दोन सासुरवाशीण मुली, सुना व नातवंडे असा त्यांचा परिवार आहे.

# पनवेल महानगरपालिकेसाठी आता स्वतंत्र शहर क्षयरोग नियंत्रण कार्यालय

## मनपाच्या प्रयत्नास यश, शासनाची मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाचा राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP) अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्वतंत्र 'शहर क्षयरोग केंद्र (सिटी टीबी ऑफिस)' स्थापन करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकतीच मान्यता दिली आहे. वाढत्या नागरी लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर क्षयरोग नियंत्रण व निर्मूलनासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा उभारण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय असून, त्यामुळे रुग्णांना अधिक सुलभ, जलद व परिणामकारक आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.



महापौर नितीन पाटील तसेच आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने डॉ.आनंद गोसावी यांनी याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यास यश मिळाले असून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वतंत्र 'शहर क्षयरोग केंद्र' हे कार्यक्रम व्यवस्थापनाचे स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे.

या कार्यालयाचे नेतृत्व शहर क्षयरोग केंद्र करणार असून कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, पर्यवेक्षण, अहवाल व्यवस्थापन, आर्थिक नियोजन तसेच जिल्हा व राज्यस्तरीय समन्वयाची जबाबदारी त्यांच्यावर असेल. यासाठी महानगरपालिकेकडून पूर्णवेळ 'सिटी टीबी ऑफिसर' नियुक्त करण्यात येणार आहे.

या कार्यालयात सिटी टीबी ऑफिसर, वैद्यकीय अधिकारी, सीनियर DOTS प्लस व TB-HIV पर्यवेक्षक, सार्वजनिक खासगी भागीदारी समन्वयक, सांख्यिकी सहाय्यक, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, लेखापाल, डेटा एन्ट्री ऑपरेटर तसेच आवश्यकतेनुसार सीनियर ट्रीटमेंट सुपरवायझर (STS), सीनियर ट्युबरक्युलोसिस लॅबोरेटरी सुपरवायझर (STLS) आणि ट्युबरक्युलोसिस हेल्थ व्हिजिटर (TBHV) अशी आवश्यक मनुष्यबळ रचना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शहर क्षयरोग केंद्राच्या प्रभावी कार्यासाठी स्वतंत्र कार्यालयीन जागा, वाहन व्यवस्था, संगणक, इंटरनेट, आवश्यक कार्यालयीन साहित्य, प्रशासकीय सहाय्य व इतर मूलभूत सुविधा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच कार्यालयाच्या सुरळीत कामकाजासाठी आवश्यक प्रशासकीय आदेशही निर्गमित करण्यात येतील.

या उपक्रमामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील क्षयरोग शोध, निदान, उपचार, रुग्णांचा नियमित पाठपुरावा आणि खासगी आरोग्य संस्थांशी समन्वय अधिक सक्षम होणार आहे. परिणामी 'टीबीमुक्त शहर' या राष्ट्रीय उद्दिष्ट पूर्तीस मोठी चालना मिळेल तसेच नागरिकांना दर्जेदार आणि परिणामकारक क्षयरोग प्रतिबंधक व उपचार सेवा अधिक सक्षमपणे उपलब्ध होतील. पनवेलसमवेत लातूर इचलकरंजी, परभणी, जालना,चंद्रपूर याही ठिकाणी उपरोक्त मंजुरी मिळाली आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे इंग्लिश कॉम्पिटिशन असेसमेंट टेस्ट ग्रँड फिनालेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये आयोजित ' NELTAS इंटरनॅशनल ECAT (इंग्लिश कॉम्पिटिशन असेसमेंट टेस्ट) ग्रँड फिनाले' (आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा) २०२५-२०२६मध्ये विद्यार्थ्यांनी आपली असाधारण शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. भारतातील ३५०हून अधिक शहरे आणि ७००हून अधिक शाळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांशी या प्रतिष्ठित स्पर्धेत त्यांनी चुरशीची स्पर्धा केली.

या स्पर्धेत काव्या रुपोलिया हिने द्वितीय क्रमांक पटकावला, तर हर्षिता कदमआणि एम. कीर्ती वर्धिनी या दोन विद्यार्थिनींनी आपापल्या गटात तृतीय क्रमांकमिळवून संस्थेचा गौरव वाढवला. त्यांची ही उत्कृष्ट कामगिरी त्यांच्या समर्पण, कठोरपरिश्रम आणि शैक्षणिक नैपुण्याचे प्रतीक ठरली. अंतिम फेरीसाठी एकूण १६३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे जेबीएसपी संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी सदस्य राहुल घरत व. स्वप्नील ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडादे आणि मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी अभिनंदन व कौतुक केले.




# पनवेल महानगरपालिका स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा आज दिनांक २८ जुलै रोजी महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजूरी देण्यात आली.



यावेळी सर्व स्थायी समिती सदस्य,अतिरीक्त आयुक्त १ गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त २ महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपअभियंता विलास चव्हाण, सचिव नानासाहेब कामठे, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी उपसचिव अक्षय कदम ,महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'ब,' सेक्टर ०७, भूखंड क्र. G-१, नविन पनवेल (पूर्व) येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करणे. या कामास सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबतीचा विषय स्थायी समितीने मंजूर केला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब, प्रभाग क.१५ सेक्टर-०८. भूखंड क्र.१४, खांदा कॉलनी, न्यु पनवेल येथे माता रमाबाई आंबेडकर सांस्कृतिक भवन उभारणे. या कामाच्या सकारात्मक व नकारात्मकला मान्यता मिळणेबाबतचा विषय रद्द करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब व ड येथील रस्त्यांचे डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे. या कामाच्या सकारात्मक व नकारात्मक ला मान्यता मिळण्याबाबतच्या विषयासे मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र.०१ दि.बा.पाटील शाळेमध्ये बहुउद्देशीय सभागृहात ऑडिओ व्हिजुअल पायाभूत सुविधा स्थापन करणेबाबतच्या विषय स्थायी समितीमध्ये बहुमताने मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक उद्यांनामध्ये / सार्वजनिक ठिकाणी बेंचेस पुरविणेकामी तीन वर्षाकरिता दरकरार करणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. गुजराती स्मशानभूमी, पनवेल येथील सार्वजनिक शौचालय निष्कासित करण्यासाठी मान्यता मिळणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ मधील भुखंड क्र. १७, सेक्टर-३६, खारघर येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर डायलेसिस सेंटर उभारणे. या कामाच्या कमी व अधिकला मान्यता मिळण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, प्रभाग क्र. ०९ मधील भुखंड क्र.G-१. सेक्टर -०७, नविन पनवेल (पुर्व) येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर डायलेसिस सेंटर उभारणे, या कामाच्या कमी व अधिकला मान्यता मिळणेबाबत विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, प्रभाग क्र. ११ कामोठे, सेक्टर-०९ मधील अंतर्गत रस्त्यातील नादुरुस्त फुटपाथची दुरुस्ती करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क मधील लायन्स गार्डन ते तहसील ऑफीस ते HOC कॉलनी, पर्यत रस्ता काँक्रिटीकरण करणे या कामाच्या कमी व अधिक ला मान्यता मिळण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

प्रभाग समिती "क"मधील प्लॉट नं. ७A, सेक्टर-१६, नवीन पनवेल (प.) येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणे. या कामाच्या कमी व अधिक ला मान्यता मिळण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. उरण-पनवेल मार्गाजवळ पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भुखंड क्र.५०६, पनवेल बाजुने ते करंजाडे मल:निस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर नविन पुल बांधणे, या कामाच्या व्यतिरिक्त बाब (Extra Item) सह सकारात्मक व नकारात्मकला मान्यता मिळण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र. ४, खारघर येथील सेक्टर २१ मधील भुखंड क्र.१५१ येथे महापौर यांचे निवासस्थान बांधणे, या कामाच्या कमी व अधिक ला मान्यता व पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल (पुर्व), भुखंड क्र. २८, सेक्टर-११ मधील क्रिकेट मैदानावर नवीन हिरवळ लागवड करणे बाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये ज्युनिअर, सिनिअर केजी व इ.१ली ते इ.८वी (मराठी, उर्दू व गुजराती) माध्यमातील विदयार्थ्यांना व्यवसाय पुस्तके, व्याकरण व उपयोजित लेखन पुस्तके, कला व कार्यानुभव पुस्तिका व स्टेशनरी साहित्य इत्यादीचा पुरवठा करणेबाबतचा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांच्या अनावश्यक वाढलेल्या फांद्यांची छाटणी करणे व पनवेल महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या अर्जानुसार अर्जदार यांच्याकडून पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेले विहित शुल्क आकारुन अर्जदार यांच्या मागणी नुसार व रस्त्यावरील वृक्षांच्या फांद्यांची छाटणी व सुकलेले आपत्कालीन पडलेली वृक्ष झाडे काढणेकामी मनुष्यबळ वाढविणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, कळंबोली व कम्युनिटी सेंटर, कामोठे येथील इमारतींवर सोलार यंत्रणा स्थापित करुन कार्यान्वित करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेमधील नियमित स्थायी आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी प्रितम रमेश पाटील, कनिष्ठ अभियंता आणि विशाल पांडुरंग पाटील, सफाई कामगार यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम मंजूर करणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महागरपालिका हद्दीमध्ये भटके श्वान (कुत्रे) / मांजराचे निर्बिजीकरण करणेकामी नियुक्त केलेल्या M/s. In Defense of Animals, India यांचा कार्यादेश मुदतवाढ करणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवीन पनवेल, कळंबोली व पनवेल शहरात उंच जलकुंभ बांधण्याचा विषय` मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे सेक्टर-३२ येथील ८५ एम.एल.डी. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्राचे सिडकोने नियुक्त केलेले ठेकेदारामार्फत "परिचलन, देखभाल व दुरुस्ती" महानगरपालिकेमार्फत नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत वाढीव मुदतीबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

# महाराजा दक्ष प्रजापती जयंती पनवेल, उरणमध्ये उत्साहात साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ (नोंदणीकृत), राष्ट्रीय सामाजिक संस्था (NGO) यांच्या वतीने प्रजापती समाजाचे आराध्य दैवत, सृष्टीचे महान शिल्पकार आणि ब्रह्मदेवांचे मानसपुत्र महाराजा श्री दक्ष प्रजापती यांची जयंती पनवेल व उरण येथे श्रद्धा, भक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच महाराजा श्री दक्ष प्रजापती यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व पुष्पांजली वाहून करण्यात आली. त्यानंतर समाजबांधवांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून दर्शन घेतले. "महाराजा श्री दक्ष प्रजापती यांचा विजय असो" या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराजा श्री दक्ष प्रजापती यांच्या आदर्शांवर, त्याग, समाजसेवा आणि लोककल्याणकारी कार्यांवर प्रकाश टाकत समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षण, संघटन, सेवा आणि सामाजिक उन्नतीसाठी कार्यरत राहण्याचे आवाहन केले. तसेच समाजसेवक व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

जयंतीनिमित्त उरण येथे विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य, वह्या आणि अभ्यास साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लाभ घेतला. शिक्षण प्रसार आणि सामाजिक जनजागृतीसाठी हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती, राष्ट्रीय मुख्य महासचिव गजेंद्र प्रजापती, रायगड जिल्हाध्यक्ष सूर्यनाथ परदेसी, रायगड जिल्हा महासचिव इंद्र प्रजापती, उरण तालुका अध्यक्ष काशीनाथ परदेसी, उरण शहराध्यक्ष वशिष्ठ परदेसी, पनवेल शहराध्यक्ष राजेंद्र प्रजापती यांच्यासह राकेश कुमार प्रजापती, कुलदीप प्रजापती, संजय प्रजापती, प्रियांश प्रजापती, हुकुमलाल प्रजापती, कोलेश्वर प्रजापती, रोहित प्रजापती, जितेंद्र प्रजापती, राजकुमार प्रजापती, प्राणनाथ प्रजापती, दीपक प्रजापती, सुभाष प्रजापती, राकेश प्रजापती तसेच अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी मोलाचे योगदान दिले. समारोप प्रसंगी उपस्थितांनी महाराजा श्री दक्ष प्रजापती यांच्या आदर्शांचे अनुसरण करून समाजाला संघटित, सुशिक्षित आणि सक्षम बनविण्याचा तसेच समाजसेवेची परंपरा अधिक बळकट करण्याचा सामूहिक संकल्प केला.



**उरण : घारापुरी येथील स्थानिक स्टॉलधारकांवर होणाऱ्या अन्यायाबाबत उरण तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांची भेट घेऊन आकारण्यात येणाऱ्या भाड्याबाबत व करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत लक्ष घालून त्यांना न्याय देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी त्रिकाल पाटील, रमेश पाटील, स्मिता पाटील, वनिता माधव उपस्थित होते.**

# 'सीकेटी'तील विद्यार्थ्यांसाठी सायबर जागरूकता सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोलिस डिपार्टमेंट ऑफ सायबर सिक्युरिटी, खांदेश्वर तर्फे सोमवार (दि.२७) रोजी विद्यार्थी जागरूकता सत्र सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सायबर सेलचे ए पी आय घगडल,हेड कॉन्स्टेबल मनोज जाधव उपस्थित होते.शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, शिक्षक आणि इयत्ता नववी दहावीचे विद्यार्थी यांचा सहभाग या कार्यक्रमात लाभला.

यावेळी सायबर सिक्युरिटी तसेच सायबर क्राइम याबाबत ही माहिती सांगण्यात आली. त्यांनी काही उदाहरणाद्वारे तसेच घडलेल्या काही घटना सांगून विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याच्या सूचनाही देण्यात आली.



## संपादकीय

# समतोल आवश्यक

गणेशमूर्तींची निर्मिती, वितरण व विक्री या संपूर्ण व्यवहाराशी संबंधित समाजातील विविध घटकांशी नीट संवाद साधून दीर्घकालीन आणि व्यवहार्य धोरण तयार करण्याची राज्य सरकारची भूमिका दिसते आहे. आवश्यक निर्णय घाईघाईने व एकतर्फी पद्धतीने घेतला गेल्यास त्याच्या अंमलबजावणीत अडचणीच अधिक येतील. यासंदर्भात संबंधितांशी संघर्षाऐवजी सहकार्य आवश्यक आहे.

**पर्यावरणाचे रक्षण किती महत्त्वाचे आहे याची जाणीव कदाचित आजच्या काळाइतक्या तीव्रतेने यापूर्वी सगळ्यांना नव्हती. परंतु हवामानबदलाचे गंभीर परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागल्याने पर्यावरण रक्षणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे हे एव्हाना सगळ्यांनाच कळून चुकले आहे. नद्या, तलाव आणि समुद्रातील हरतऱ्हेचे प्रदूषण टाळणे हा पर्यावरण रक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि ती आपली सगळ्यांचीच जबाबदारी आहे. दरवर्षी गणेशोत्सव जवळ आला की पीओपीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनामुळे नैसर्गिक जलस्त्रोतांची होणारी हानी आणि प्रदूषण चर्चेत येते. यावर्षी तर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पुन्हा नागरिकांना पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्तीच स्वीकारण्याचे आवाहन करून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करत आहेत. रविवारी 'मन की बात' कार्यक्रमादरम्यान त्यांनी पुन्हा एकदा 'यंदाच्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी (पीओपी) मातीच्याच मूर्ती स्थापन करा' असे आवाहन केले व पर्यावरणपूरक उत्सव ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले. महाराष्ट्रातील राज्य सरकारही त्याच दृष्टीने प्रयत्नशील आहे. परंतु राज्य सरकारला या प्रश्नाची दुसरी बाजूही विचारात घ्यावी लागते आहे. राज्यातील हजारो मूर्तिकार, कारागीर, रंगकाम करणारे कामगार, या व्यवसायावर अवलंबून असलेले वाहतूक व्यावसायिक आणि मूर्तींचे लहानमोठे विक्रेते यांचे वर्षभराचे अर्थकारण बहुतांशी गणेशोत्सवावर अवलंबून असते. यापैकी अनेक जणांनी एव्हाना पीओपीच्या मूर्ती तयारही केल्या आहेत. अशावेळी अकस्मात पीओपीच्या मूर्तींवर कठोर निर्बंध लागू केल्यास ते मोठ्या आर्थिक संकटात सापडू शकतात. त्यामुळेच पर्यावरण आणि रोजगार या दोन्हींचा समतोल राखताना राज्य सरकारला मोठी तारेवरची कसरत करणे भाग पडते आहे असे दिसते. मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच झालेल्या सुनावणीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून केलेल्या मातीच्या गणेशमूर्तींच्या आवाहनाची दखल घेतली व महाराष्ट्र सरकारला त्याबाबतची भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले. यापूर्वीच्या सुनावणीतही न्यायालयाने पर्यावरण संरक्षणाबाबत चिंता व्यक्त केली होती तर राज्य सरकारने पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलाशयांतील विसर्जन टप्प्याटप्प्याने कमी करण्याची भूमिका मांडली होती. पर्यावरणपूरक पर्यायांना प्रोत्साहन देतानाच कारागिरांना वेळ, प्रशिक्षण आणि आवश्यक आर्थिक आधार मिळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. न्यायालय पर्यावरणाचे संरक्षण करण्याची सुयोग्य व अत्यावश्यक भूमिका बजावत आहे तर राज्य सरकारला पर्यावरण रक्षणासोबतच सामाजिक आणि आर्थिक परिणामांचाही विचार करावा लागतो आहे. न्यायालयाच्या सूचनांचा आदर राखत सरकारने पर्यावरणपूरक मूर्तींचा प्रसार वाढवणे, कृत्रिम विसर्जन तलावांची संख्या वाढवणे, मूर्तिकारांना शाडू मातीसाठी अनुदान आणि प्रशिक्षण देणे तसेच जनजागृती मोहीम अधिक प्रभावी करणे हा पुढचा मार्ग असू शकतो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा अविभाज्य भाग आहे. त्याचे पर्यावरणपूरक रूपांतर हे समाजाच्या सहभागातूनच शक्य आहे. परंपरेचा सन्मान, पर्यावरणाची जपणूक आणि हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे संरक्षण या तिन्ही गोष्टींचा समतोल राखण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून सुरू आहे.**

# व्यास पौर्णिमा अर्थात गुरूपौर्णिमा

आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरूपौर्णिमा म्हणून गौरवितो. आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगल दिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे. अशा या आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्याला मानतात, त्या ज्ञानदेवांनीसुध्दा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घेतू' असे म्हणून सुरुवात केली.


व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण–महाभारत काळापासून गुरू–शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.

या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशीर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा ईश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु – पारमार्थिक या दिवशी भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

खरं गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन!

गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा तोंडून श्लोक बाहेर पडतो –

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः॥



आषाढ शुद्ध पौर्णिमा हा दिवस गुरुपौर्णिमा म्हणून स्वीकारला आहे. त्यानिमित्त महर्षी व्यासांनी वेदाचे चार भाग, सहा शास्त्रे, अठरा पुराणांच्या रचना करून मानवी जीवनाला संपन्न केले आहे. या सर्वांतून भगवंताचे गुणगान, त्यांचे यशगान करीत मनुष्याला जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले आहे. या अमोलिक कार्याची कृतज्ञता म्हणून भारतीय पूर्वसुरींनी व्यासांचे पूजन या दिनी केल्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' अथवा ''गुरुपौर्णिमा' असे म्हणतात. गुरु दोन प्रकारचे असतात एक गुरु ! एक सदगुरु! अवधूतांनी यदुराजाला उपदेश करताना सांगितले की, "जो जो जयाचा घेतला गुण । तो म्यां गुरु केला जाण । गुरुसी पडले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ॥" असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले. या चोविसांचे महत्व तीन प्रकारांत आहे. एक सदगुण अंगीकारासाठी गुरू, दोन अवगुण त्यागासाठी गुरु आणि तीन ज्ञानप्राप्तीसाठी गुरु. म्हणजे 'गुरु' हे लौकिक दृष्टीने जे मार्गदर्शन करतात ते या विभागात येतील.

ज्यांनी आत्मनात्मविवेक सांगून मायेच्या संसाररूपी पुरातून मला वाचविले तो सदगुरु अखंड माझ्या हृदयात आहे, म्हणूनच माझे या विवेकावर प्रेम आहे. आदर आहे. ज्याप्रमाणे डोळ्यांत अंजन घातले असता दृष्टीचे तेज वाढते त्या दृष्टीने भूमिगत धन दिसू लागते. (दडलेले ज्ञान स्पष्ट दिसू लागणे.) ज्याप्रमाणे हाती चिंतामणी लागल्यास मनुष्याचे सदासर्वदा मनोरथ पूर्ण होतात.

'गुरुचरित्र' या ग्रंथात श्री गुरुंच्या लीलांचे वर्णन असले तरी गुरुंच्या ध्यानाचे, सेवेचे, भावाचे, पूजनाचे महत्व सांगितले आहे. कलीने ब्रह्मदेवांना 'गुरु' शब्दाचा अर्थ विचारला तेव्हा ब्रह्मदेवांनी सांगितला, की 'ग' कार म्हणजे सिध्द होय. 'र' कार म्हणजे पापाचे दहन करणारा. 'उ' कार म्हणजे विष्णूंचे अव्यक्त रूप तसेच गुरु हाच ब्रह्मा, विष्णू, महेश. हे त्याचे त्रिगुणात्मक रूप आहे. या पलीकडे जे परब्रह्म तत्व आहे ते जाणण्यासाठी गुरुंचा आश्रय घ्यावा लागतो. ईश्वर जरी प्रसन्न झाला तरी त्याला ओळखणारा गुरुच असतो व गुरु स्वतः प्रसन्न झाला तर ईश्वर आपल्या अधीन होतो.

आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. भारतीय गुरुपरंपरेत गुरु–शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक–याज्ञवल्क्य, शुक्राचार्य–जनक, कृष्ण, सुदामा–सांदिपनी, विश्वामित्र–राम, लक्ष्मण, परशुराम–कर्ण, द्रोणाचार्य–अर्जुन अशी गुरु–शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही.

भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी वडीलबंधू निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले, तर संत नामदेव साक्षात विठ्ठलाशी भाष्य करीत असत. त्या नामदेवांचे गुरु होते विसोबा खेचर. भारतीय संस्कृतीत गुरूला नेहमीच पूजनीय मानले आहे.

गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पौर्णिमा मानली जाते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरु शिष्याला ज्ञान देतात. तो ज्ञानाचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचावा, म्हणून गुरूची प्रार्थना करावयाची, तो हा दिवस होय.

गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर आहे. जलाशयात पाणी विपुल आहे, परंतु घटाने–घागरीने आपली मान खाली केल्याशिवाय म्हणजे विनम्र झाल्याशिवाय पाणी मिळू शकत नाही. त्याप्रमाणे गुरूजवळ शिष्याने नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवावे. 'गुरु बिन ज्ञान कहासे लावू?' हेच खरे आहे.

### गुरू म्हणजे गुह्य रूप

गुरू–अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जातात ते! आपल्या जीवनात गुरुंना जेवढे महत्त्व आहे तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्व सदगुरुंना आहे. सर्व मानवजातीला पारमार्थिक, आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे, भक्ताला, साधकाला मोक्षाप्रत नेणारे सदगुरु, त्यांच्या स्मरणासाठी, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'गुरुपौर्णिमा' (आषाढ पौर्णिमा) हा पर्वकाल सांगितला आहे. सुप्रसिध्द गुरु–शिष्यांच्या जोड्या आपणा सर्वांना परिचित आहेत.

'गुरुबिन कौन बतायें 'बाँट ।' हा मायारूपी भवसागर तरून जायचे असेल, तर सदगुरुंची आवश्यकता आहे. सदगुरुच आपल्याला मोक्षाप्रत नेतात. एकदा त्यांना आपला हात हातात घेतला की ते आपल्याला सोडत नाहीत. सदगुरुंना शोधण्यासाठी आपणांस जावे लागते असे नाही, तर शिष्याची आध्यात्मिक तयारी झाली की, ते स्वतःहूनही त्याला शोधत येतात. आपल्या पूर्व प्रारब्धकर्मानुसार आपल्याला सदगुरु भेटतात. सदगुरुंकडून एकदा का अनुग्रह घेतला की, त्याचे स्मरण अहोरात्र करावयाचे असते. जशी प्रतिव्रता स्त्री तिच्या पतीचे स्मरण करते; त्याप्रमाणे सदगुरुंनी दिलेल्या नामात खूप मोठी शक्ती आहे. नामधारकाच्या मागे–पुढे उभे राहून ते नाम त्यांच्याकडून पूर्ण करून घेतात. तसेच त्यांची त्यात सत्ता पण असते. सदगुरुच सर्व काही करवून घेत असल्यामुळे नामधारकाच्या 'मी' ला कुठेही वाव नसतो. सदगुरुंकडून अनुग्रह घेतला की दुसऱ्या कोणत्याही संतांकडून अनुग्रह घेऊ नये अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी एकनिष्ठेने राहावे. एक गुरु, एक नाम असावे. त्यांनी दिलेल्या नामात भगवंताचे प्रेम असते.

सदगुरुंची प्राप्ती झाल्यानंतर 'गुरुसेवा' करणे हे शिष्याचे परमकर्तव्य आहे. गुरुसेवा म्हणजे त्यांची आज्ञा पाळणे. मनात कोणताही किंतू न ठेवता, विकल्प येऊ न देता त्यांनी सांगितलेली साधना नित्यनियमाने प्रेमाने करावी. तसेच साधकाची संपूर्ण शरणागती असावी. शरण जाणे म्हणजे सदगुरु ठेवतील त्या अवस्थेत समाधानात राहणे, त्यांच्या इच्छेत आपली इच्छा मिसळणे. कोणत्याही परिस्थितीत नाम घेण्याचे सोडू नये, नामावर, सदगुरूवर पूर्ण विश्वास, श्रद्धा ठेवणे. त्यांनी सांगितलेले साधन न करता इतर साधन केल्यास वृथा कष्टच होतील आणि पदरात काही पडणार नाही. सदगुरुंना जे शरण जातात त्यांचा कार्यभार सदगुरु उचलतात. त्यांच्या मागे–पुढे उभे राहून ते सत्तारूपाने त्यांना मदत करतात. सदगुरु नावाड्याचे काम करतात. आपली जीवनरूपी नौका योग्य दिशेला घेऊन जातात.

भगवंताच्या आशीर्वादानेच आपली सदगुरुंशी भेट होते व सदगुरुंकडे नाम मिळाल्यानंतरच ईश्वराच्या व्यापक स्वरूपाची महती कळते.

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।
मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सदगुरु पाय दोन्ही ॥

(साभार इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# OTP किंवा PIN न टाकता बँक अकाउंट रिकामे होण्याचा धोका

डिजिटल पेमेंटचा वापर झपाट्याने वाढत असताना सायबर फसवणुकीचे नवे प्रकारही समोर येत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे NFC (Near Field Communication) स्कॅम. या प्रकारात फसवणूक करणारे तुमचे डेबिट किंवा क्रेडिट कार्ड चोरत नाहीत, पिन किंवा ओटीपीही विचारत नाहीत, तरीही आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न करू शकतात.



विशेष म्हणजे, 'टॅप अँड पे' सुविधा सुरू असलेल्या कार्डधारकांना या प्रकाराचा अधिक धोका असतो. त्यामुळे हा स्कॅम नेमका कसा होतो आणि त्यापासून कसे बचाव करायचे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

### NFC स्कॅम म्हणजे काय?

NFC हे असे तंत्रज्ञान आहे, ज्याच्या मदतीने मोबाईल किंवा बँक कार्ड कार्ड रीडरजवळ आणून संपर्कविरहित पेमेंट करता येते. याच तंत्रज्ञानाचा गैरफायदा सायबर गुन्हेगार घेण्याचा प्रयत्न करतात. जर तुमच्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डवर 'टॅप टू पे' सुविधा सुरू असेल आणि कार्ड एखाद्या अनोळखी कार्ड रीडरच्या अगदी जवळ आले, तर लहान रकमेचा व्यवहार करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. यामुळे गर्दीच्या ठिकाणी आपल्या कार्डचा अनोळखी उपकरणांशी संपर्क होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.

### कोणाला अधिक सतर्क राहण्याची गरज?

ज्या ग्राहकांच्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डवर कॉन्टॅक्टलेस पेमेंट सुविधा सुरू आहे, त्यांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः बस आणि मेट्रो, बाजारपेठ, रेल्वे स्थानके,मॉल आणि इतर गर्दीची सार्वजनिक ठिकाणी सावध राहा.अशा ठिकाणी आपले पाकिट, बॅग आणि कार्ड सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. जर तुम्ही टॅप टू पे सुविधा वापरत नसाल, तर ती बँकेशी संपर्क साधून बंद करून घेऊ शकता. अनेक बँका आणि कार्ड ॲप्समधूनही ही सुविधा ऑन किंवा ऑफ करण्याचा पर्याय उपलब्ध असतो.

### थोडी सावधगिरी, मोठे नुकसान टाळू शकते

डिजिटल व्यवहारांमुळे पेमेंट प्रक्रिया अधिक सोपी झाली असली, तरी सायबर गुन्हेगारही नवनवीन पद्धती वापरत आहेत. त्यामुळे डिजिटल पेमेंट करताना सतर्क राहणे, व्यवहारांवर नियमित लक्ष ठेवणे आणि बँकेच्या सुरक्षा सुविधांचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. वेळीच खबरदारी घेतल्यास NFC स्कॅमसारख्या डिजिटल फसवणुकीपासून स्वतःचे आर्थिक नुकसान सहज टाळता येऊ शकते.

# सुधीर फडके उर्फ बाबूजी

प्रसिद्ध मराठी भावगीतगायक आणि चित्रपटक्षेत्रातील निर्माते, संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक रामचंद्र ऊर्फ सुधीर विनायकराव फडके अर्थात बाबूजी. त्यांची आज पुण्यतिथी...



## निमित्त

बाबूजींचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या आई सरस्वतीबाई बालपणीच निवर्तल्या (१९२८). वडील विनायकराव वकील होते. बाबूजींचे शालेय शिक्षण कोल्हापुरात झाले. गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये आणि बाबूराव गोखले यांच्याकडे बाबूजींनी काही वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच शिकवण्यांचे व संगीत शिक्षकाचे काम करावे लागले. पुढे त्यांनी अधिक संगीतसाधनेसाठी मुंबईला प्रयाण केले (१९३६). तेथेही शिकवण्या, मेळ्यातील गाण्यांना चाली लावून देणे वगैरे करून चरितार्थ चालवला. त्यांच्या गायनाचा पहिला जाहीर कार्यक्रम मिरजेत झाला (१९३१).

मुंबईत आकाशवाणीवरील बाबूजींचा पहिला कार्यक्रम १९३७मध्ये झाला. शिवाय त्यांनी १९३९–४१दरम्यान खानदेश, विदर्भ, बिहार, पंजाब, राजस्थान, बंगाल अशी भ्रमंती केली. या भ्रमंतीत त्यांना तेथील संगीत जवळून अनुभवावयास मिळाले. कोलकात्यात (पूर्वीचे कलकत्ता) त्यांना एका ग्रामोफोन कंपनीत नोकरी मिळाली, पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ती सोडून ते कोल्हापुरास परतले. याच सुमारास त्यांनी हिज मास्टर्स व्हाइस (एचएमव्ही मुंबई) या ध्वनिमुद्रिका संस्थेशी करार करून अनेक गीतांना संगीत दिले व ती गायली (१९४५). त्यावेळी त्यांनी गायलेली 'दर्यावरी नाच करी' व 'झिमझिम पाऊस पडतो' ही गाणी विशेष गाजली.


१९४६ सालापासून बाबूजींनी एकंदर ८४ मराठी व २२ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ८७७ गीते संगीतबद्ध केली, तर १४४ मराठी व नऊ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ५११ गीते गायिली. त्यांची अनेक हिंदी–मराठी गाणी अजरामर झाली. जगाच्या पाठीवर, सुवासिनी, हा माझा मार्ग एकला, प्रपंच, संथ वाहते कृष्णामाई, भाभी की चूडियाँ या चित्रपटांचे संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक म्हणून त्यांना पारितोषिके मिळाली. १९५५ साली पुणे आकाशवाणीवर प्रसिद्ध झालेल्या आणि साहित्यिक ग.दि. माडगूळकर यांनी रचलेल्या गीतरामायणातील गीतांना बाबूजींनी उत्स्फूर्त चाली दिल्याआणि स्वतः ती गीते गायिली. या स्वरशिल्पाने इतिहास रचला. १९५८पासून गीतरामायणाचे शेकडो कार्यक्रम महाराष्ट्रासह भारतात आणि परदेशात झाले.

बाबूजींचा विवाह ख्यातकीर्त पार्श्वगायिका ललिता देऊळगावकर यांच्याशी झाला (१९४९). त्यांचे पुत्र श्रीधर फडके हे आघाडीचे संगीतकार–गायक आहेत.

बाबूजींच्या संगीतसेवेबद्दल त्यांना अनेक मानसन्मान लाभले. बाबूजींच्या जीवनाचा अनोखा पैलू म्हणजे त्यांची प्रखर राष्ट्रभक्ती, ध्येयनिष्ठा, सर्जनशीलता आणि समाजसेवा. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते होते आणि काही काळ प्रचारक होते. गोवा मुक्तिसंग्रामात त्यांचा सहभाग होता. वृद्धापकाळाने बाबूजींचे २९ जुलै २००२ रोजी मुंबई येथे निधन झाले.

(साभार मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दररोज ३० मिनिटे अनवाणी चालण्याचे फायदे

तंदुरुस्त राहण्यासाठी लोक सहसा चालणे आणि जॉगिंगचा अवलंब करतात, पण तुम्हाला माहिती आहे का की अनवाणी चालणे देखील आरोग्यासाठी फायदेशीर आहे? आरोग्य सुधारण्याचा हा एक अतिशय सोपा आणि मोफत मार्ग आहे. दररोज अनवाणी चालणे याला इंग्रजीत बेअरवेट वॉकिंग म्हणतात. मधुमेहाच्या रुग्णांना गवतावर अनवाणी चालण्याचा सल्ला दिला जातो.जर तुम्ही दररोज फक्त ३० मिनिटे गवतावर किंवा जमिनीवर अनवाणी चाललात तर तुमचे शारीरिक आरोग्य सुधारतेच, पण मानसिक ताणही बऱ्याच प्रमाणात कमी होतो. चला तर मग जाणून घेऊया दररोज ३० मिनिटे अनवाणी चालल्याने शरीरात कोणते बदल होतात आणि त्यामुळे आपल्याला कोणते फायदे होतात. याबद्दल जाणून घेऊया.



### झोप आणि मनःस्थिती सुधारते

अनवाणी चालण्याने शरीर पृथ्वीच्या संपर्कात आल्यावर त्यातून बाहेर पडणारी ऊर्जा (पृथ्वीचे नैसर्गिक इलेक्ट्रॉन) मेलाटोनिन (झोप नियंत्रित करणारे संप्रेरक) आणि सेरोटोनिन (मूड स्थिर करणारे संप्रेरक) यांचे संतुलन राखते. जर तुम्ही दररोज ३० मिनिटे अनवाणी चाललात तर मन शांत राहते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते आणि मूडदेखील चांगला राहतो.

### चिंता आणि ताण कमी करते

दररोज अनवाणी चालल्याने मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. जेव्हा तुम्ही अनवाणी चालता तेव्हा शरीरात जमा झालेले इलेक्ट्रोमॅग्नेटिक चार्ज बाहेर पडते आणि त्यामुळे कोर्टिसोलची पातळी (तणाव संप्रेरक) कमी होते.

### लवचिकता वाढवा

शूज घालल्याने आपले पाय नेहमीच सारख्याच प्रकारे हालचाल करतात, परंतु अनवाणी चालल्याने पायाच्या स्नायू, अस्थिबंधन आणि घोट्यांची हालचाल सुधारते. यामुळे शरीराची लवचिकता वाढते आणि सांधेदुखी, कडकपणा आणि स्नायूंच्या घट्टपणापासून आराम मिळतो.

### रक्ताभिसरण आणि हृदयाचे आरोग्य सुधारते

जेव्हा पायांची त्वचा जमिनीशी थेट संपर्कात येते तेव्हा रक्त प्रवाह सुधारतो. यामुळे हृदयाला पंप करणे सोपे होते. उच्च किंवा कमी रक्तदाबाच्या समस्या संतुलित होतात आणि पायांच्या नसांमध्ये ऑक्सिजनचा प्रवाह सुधारतो.

# एकसंघ राहून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाचा विकास साधा

## आमदार रविशेठ पाटील यांचे ग्रामस्थांना आवाहन

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ ग्रामपंचायतीचा विकास वेगाने होत असून गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने व एकसंघटित राहून काम करा असते आवाहन आमदार रविशेठ पाटील यांनी केले. वडखळ ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन व इतर विकासकामांचे उदघाट्न आमदार रवीशेठ पाटील यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.




या कार्यक्रमास जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, पं.स. सभापती स्मिता पाटील, जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, वडखळ सरपंच शिवानी म्हात्रे, उपसरपंच योगिता मोकल, सदस्य योगेश पाटील, पं.स. सदस्य प्रदीप म्हात्रे, जेएसडब्ल्यू कंपनीचे सीएसआर विभागाचे प्रमुख सुधीर तेलंग, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, विस्तार अधिकारी विक्रांती तांडेल, वडखळ पोलीस निरीक्षक संतोष जाधव, माजी सरपंच राजेश मोकल, शरद म्हात्रे, ग्रा. सदस्य, ग्रामसेवक श्रीहरी खरात यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, रायगड जिल्ह्यातील सर्वात वेगाने विकसित होणारे गाव वडखळ असून जिल्ह्याच्या मध्यवर्ती असलेले ठिकाण आहे. त्यामुळे येथे सर्व सुविधा सुसज्ज असायला हव्यात.

नवीन वडखळ ग्रामपंचायतचे कार्यालय सुसज्ज होणार असून याचा उपयोग भविष्यातील गरजांसाठी होईल असे बांधण्यात यावे. योगेश पाटील सारखे कार्यकर्ते गावाच्या विकासात पुढाकार घेत आहेत त्यानं सवाना साथ द्यावी. जेएसडब्ल्यू कंपनीच्या वतीने मोठा निधी या इमारत बांधकामासाठी देण्यात आल्याबद्दल रविशेठ पाटील यांनी कंपनी प्रतिनिधींना धन्यवाद देऊन इतर गावांचाही विकास व्हावा तसेच कंपनीत स्थानिक भरतीला प्राधान्य देण्यात यावे असे सांगितले.

यावेळी प्रास्ताविकात सरपंच शिवानी म्हात्रे यांनी वडखळ विभाग व ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या गावांना उत्कृष्ट सेवा देण्याच्या दृष्टीने नवीन प्रशस्त कार्यालयाचे बांधकाम होत असून यातून अनेक सुविधा आगामी काळात राबविण्यात येथील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी जेएसडब्लू कंपनीतर्फे वडखळ हद्दीत सुमारे तीस कोटी खर्चाची विकासकामे करणार असल्याचे सुधीर तेलंग यांनी येथे सांगितले. पुढील काळातही अशीच कामे होत राहतील यासाठी ग्रामस्थांचा सहभागही महत्त्वाचा असणार आहे,असे शेवटी ते म्हणाले. ग्रा.सदस्य निलेश म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

जिल्ह्यातील सर्वात वेगाने विकसित होणारी ग्रामपंचायत म्हणजे वडखळ होय. यापुढे अजून स्मार्ट स्कुल, आरोग्य उपकेंद्र, बाजारपेठ, पक्के रस्ते विकसित होणार असल्याचे सभापती वैकुंठ पाटील यांनी येथे सांगितले.

# ताम्हिणी घाटरस्त्याची मंत्री भरत गोगावलेंकडून पाहणी

### प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य, युद्धपातळीवर कामे पूर्ण करण्याचे निर्देश

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा तसेच निसर्ग सौंदर्यासाठी देशभर प्रसिद्ध असलेला ताम्हिणी घाट मार्ग पावसाळ्यात दरडी कोसळणे, रस्ता खचणे आणि वाहतूक विस्कळीत होणे अशा गंभीर समस्यांना वारंवार सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी ताम्हिणी घाट परिसराला प्रत्यक्ष भेट देत रस्त्याच्या सद्यस्थितीची आणि सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामांची सविस्तर पाहणी केली.

पाहणीदरम्यान मंत्री गोगावले यांनी घाटातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. अतिवृष्टीमुळे खचलेले रस्ते, दरडी कोसळण्याची शक्यता असलेले भाग, वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी ठिकाणे तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची त्यांनी सखोल समीक्षा केली. यावेळी त्यांनी सार्वजनिक बांधकाम



विभागासह संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना अपघातप्रवण ठिकाणी तातडीने संरक्षक उपाययोजना राबविण्याचे, आवश्यक यंत्रसामग्री व मनुष्यबळ सदैव सज्ज ठेवण्याचे तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. ताम्हिणी घाट हा पुणे, रायगड आणि कोकणातील पर्यटन तसेच दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग असल्याने रस्ता शक्य तितक्या लवकर वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू असल्याचे मंत्री गोगावले यांनी सांगितले.

रस्ता पूर्ववत करण्यासाठी शासन आवश्यक ते सर्व निर्णय तातडीने घेईल आणि कामात कोणताही विलंब होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पाहणी दरम्यान संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी रस्ता दुरुस्तीची सद्यस्थिती, दरडी हटविण्याचे काम, संरक्षण भिंती उभारणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आखण्यात आलेल्या नियोजनाची माहिती मंत्र्यांना दिली.

यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी नागरिक आणि पर्यटकांना पावसाळ्यात घाटमार्गातून प्रवास करताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले. हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच प्रवास करावा, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि धोकादायक ठिकाणी अनावश्यक गर्दी टाळावी, असेही त्यांनी सांगितले. प्रवाशांचा सुरक्षित, सुरळीत आणि सुखकर प्रवास सुनिश्चित करण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध केली असल्याचे त्यांनी सांगीतले.

## आदिवासी ठाकूर समाज संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर; कांता पादीर अध्यक्षपदी



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी ठाकूर समाजाच्या सामाजिक आणि शैक्षणिक चळवळीला बळ देणाऱ्या आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जतच्या अध्यक्षपदी कांता भिका पादीर यांची एकमताने निवड करण्यात आली.

रामाचीवाडी येथील धानकोबा मंदिरात रविवारी (२६ जुलै) झालेल्या बैठकीत तालुक्यातील आदिवासी समाज बांधवांच्या उपस्थितीत संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.या बैठकीत मावळते अध्यक्ष परशुराम दरवडा यांनी संघटनेची जबाबदारी नवनिर्वाचित अध्यक्ष कांता पादीर यांच्याकडे सोपवली. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी नव्या कार्यकारिणीचे स्वागत करत सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कर्जत तालुक्यात आदिवासी ठाकूर समाज संघटनेची स्थापना १९८५ साली झाली. गेल्या अनेक वर्षांच्या सामाजिक कार्यातून या संघटनेने समाजातील बांधवांना एकत्र आणत सामाजिक, शैक्षणिक तसेच समाजहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, समाजबांधवांच्या अडचणी आणि हक्कांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करणे, या माध्यमातून संघटनेने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

मावळते अध्यक्ष परशुराम दरवडा यांच्या कार्यकाळात संघटनेच्या सामाजिक कार्याला अधिक व्यापक स्वरूप मिळाले. आता संघटनेच्या नेतृत्वाची धुरा कांता पादीर यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली असून त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या कार्याला आणखी वेग मिळेल, अशी अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्ष कांता भिका पादीर, उपाध्यक्ष अर्जुन नागो केवारी व लक्ष्मण उघडा, सचिव नितीन निरगुडा व राकेश कवठे, खजिनदार भरत तुकाराम पादीर व दिनेश पिंगळा, महिला अध्यक्षा जयवंती दत्तात्रेय हिंदोळा, महिला उपाध्यक्षा निलम वसंत ढोले, प्रसिद्धी प्रमुख मोतीराम पादीर व नितीन पारधी यांची निवड करण्यात आली.

संघटनेच्या नव्या कार्यकारिणीसमोर आदिवासी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे, समाजबांधवांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे आणि संघटनेचे सामाजिक कार्य अधिक व्यापक करण्याचे आव्हान असणार आहे.

ज्येष्ठांच्या अनुभवाची साथ आणि नव्या नेतृत्वाची ऊर्जा यामुळे आदिवासी ठाकूर समाज संघटनेची पुढील वाटचाल अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## नरेंद्र घाडगे ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या राज्य कौन्सिलरपदी

**माणगाव :** माणगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष नरेंद्र घाडगे यांची महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या राज्य कौन्सिलर पदी निवड करण्यात आली आहे. घाडगे यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र घाडगे यांनी रायगड जिल्ह्यातील विविध गावातील ग्रामपंचायतीमध्ये प्रभावीपणे व चांगले काम केले आहे. शासनाच्या ग्रामपंचायतमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ अनेक लाभार्थ्यांना त्यांनी मिळवून दिला आहे. शिवाय ग्रामपंचायतीत शासनाच्या विविध कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करून जनतेच्या सेवेशी तत्पर या उक्तीप्रमाणे ते ग्रामस्थांना सेवा देत असतात. एक कर्तव्यदक्ष,शांत,मितभाषी, संयमी व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांच्याबरोबरच विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी वर्ग पाहत असतात. माणगाव तालुका ग्रामपंचायत अधिकारी म्हणूनही त्यांनी चांगले काम केले आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र.२४ /२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक २५/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात 'Critical Mineral Processing Park' विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विनंती अर्ज (RFP). **(दुसरी मागणी)** | -- |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०३/०८/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ३०/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **उर्वशी दर्शन रावल व दर्शन दशरथलाल रावल** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन–: **मौजे– जुई (५५३३३०)**
**(PU–ID: २३५८९७१७६६९), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०१/६८<br>खाते क्रमांक : २३१९ | १ | ०.२४.००<br>पो.ख. ०.०३.००<br>एकूण – **०–२७–००** | २.३७ |

उर्वशी दर्शन रावल व दर्शन दशरथलाल रावल यांचे नावे असलेले एकुण क्षेत्र ०.२७.०० गुंठे

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यास आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – २९/०७/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०६
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१

# ‘नीट’मध्ये यश मिळवणाऱ्या नीरज सरसंबेचा सत्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटीए) आयोजित नीट २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या नीरज महादेव सरसंबे याचा भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत अभिनंदन केले.



नीरज हा ज्येष्ठ पत्रकार महादेव सरसंबे यांचा सुपुत्र असून अभ्यासातील सातत्य, जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या बळावर त्याने देशातील अत्यंत स्पर्धात्मक मानल्या जाणाऱ्या नीट परीक्षेत यशाची पताका फडकावली आहे. पत्रकारितेच्या धकाधकीच्या जीवनातही महादेव सरसंबे यांनी मुलाच्या शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित करून त्याला योग्य मार्गदर्शन व संस्कार दिल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी अमित घाग म्हणाले, "नीरजने मिळवलेले यश हे केवळ एका कुटुंबाचे नसून संपूर्ण रोहा तालुक्याचा अभिमान आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून जिद्दीने प्रयत्न केल्यास कोणतीही परीक्षा अशक्य नाही, हे नीरजने सिद्ध करून दाखवले आहे." तर या वेळी भाजपाचे धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, पत्रकार महादेव सरसंबे, दरनेश दारला, पत्रकार जितेंद्र जाधव उपस्थित राहून कौतुक केले.

नीरजने यापूर्वीही शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा तसेच शैक्षणिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

**सिडको** शहरांचे शिल्पकार

## नोटीस–१

साडेबावीस टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यास “ना हरकत प्रमाणपत्र” मागणी अर्जानुसार नोटीस श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर, राहणार जी–५१, गिरीकुन्ज सोसायटी, सरस्वती मार्ग, सेक्टर–८बी, सीबीडी बेलापूर–४०० ६१४. (अर्जदार).

ज्याअर्थी अर्जदार श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर यांना २२.५% विकसीत भूखंड वाटप योजनेअंतर्गत खालील तक्त्यात नमूद त्यांना वाटपित करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. हेजल आणि नाव्या इंफ्रा एलएलपी तर्फे भागीदार १) विजय भवानजी पटेल २) दिनानाथ एस. मिश्रा यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता “ना हरकत प्रमाणपत्रासाठी” अर्ज केला आहे. श्री. जयराम गोपाळ वनगा यांना वाटपित करण्यात आलेल्या भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्ज प्राप्त झाल्याची दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २३२४ | २१/०४/२०२६ | पुष्पक | २८ | ३७ | ३६८०.०० चौ. मी पैकी १८४०.०० चौ.मी. क्षेत्र (अविभाज्य भाग) | ०९/०१/२०२६ | २/२/२०२६<br>४/२/२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, नमूद भखंडासाठी ‘‘ना हरकत प्रमाणपत्र’’ देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१६३/२०२६–२७

# तत्कालीन सरकारची संशयास्पद भूमिका



**स्मिता प्रकाश :** तुमच्या मते असा आदेश गृहमंत्र्यांकडून दिला गेला होता?

**आर.व्ही.एस. मणी :** मी तसे स्पष्टपणे म्हणत नाही. मी एवढेच सांगतो की, कोणीतरी असा आदेश दिला. भारतीय नौदल किंवा तटरक्षक दल स्वतःहून अशी देखरेख थांबवणार नाही. नंतर पृथ्वीराज चव्हाण यांनीही एका मुलाखतीत काही विधान केले होते. त्याचप्रमाणे त्या काळातील पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री (Minister of State, PMO) यांनीही काही विधाने केली. त्यांच्या विधानांमधून असा अर्थ निघत होता की काही स्तरावरून मागे हटण्याचे निर्देश देण्यात आले होते.

**स्मिता प्रकाश :** पण तुम्ही तर म्हणत आहात की, त्या काळात प्रत्यक्ष निर्णय शिवराज पाटील घेत नव्हते.

**आर.व्ही.एस. मणी :** मी आधी सांगितल्याप्रमाणे मंत्रालयातील दैनंदिन परिस्थिती वेगळी होती. अनेक निर्णय कोणत्या स्तरावर घेतले जात होते हा वेगळा विषय आहे. त्या रात्री मी नियंत्रण कक्षात उपस्थित होतो. रात्री साधारण ९.३० वाजता 'एनएसजी'ला तातडीने मुंबईला पाठवण्याची मागणी करण्यात आली होती. त्याकाळात विमान वाहतूक इतकी व्यस्त नव्हती. दिल्लीहून मुंबईला पोहचण्यासाठी साधारण दोन तास लागले असते, परंतु 'एनएसजी' चे पथक विमानतळाच्या तांत्रिक विभागात जवळपास दोन तास प्रतीक्षा करीत राहिले. त्यादरम्यान आम्ही सुचवले होते की, तोपर्यंत नवी मुंबईतील 'सीआरपीएफ' किंवा विमानतळावरील 'सीआयएसएफ'ची तुकडी तात्पुरती घटनास्थळी पाठवावी. प्राथमिक प्रतिसाद देण्यासाठी ते पुरेसे ठरले असते, पण त्या सूचनेकडे दुर्लक्ष करण्यात आले. रात्री साधारण २.१५ वाजता शिवराज पाटील आपल्या निवासस्थानातून निघाले. त्यानंतर ते विमानतळावर पोहचले.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे तेव्हा हल्ला सुरू होऊन जवळपास आठ-नऊ तास उलटले होते?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, मुंबईला पोहोचल्यानंतरही औपचारिक स्वागत, प्रोटोकॉल आणि इतर प्रक्रियेमध्ये आणखी १५ ते २० मिनिटे वाया गेली. 'एनएसजी' प्रत्यक्ष कारवाईला लागेपर्यंत एकूण आठ ते दहा तासांचा विलंब झाला.

**स्मिता प्रकाश :** तुमच्या मते, हा केवळ निष्काळजीपणा होता की, जाणीवपूर्वक झालेला विलंब?

**आर.व्ही.एस. मणी :** माझ्या मते, ती युद्धजन्य परिस्थिती होती. वारंवार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सूचना दिल्या जात होत्या, पण त्यानंतरही आवश्यक निर्णय घेतले गेले नाहीत. त्या रात्री आम्ही अनेकदा सांगितले की, तातडीने स्थानिक सुरक्षा दल तैनात करा, परंतु कोणताही निर्णय झाला नाही. त्या परिस्थितीत प्रत्येक मिनिट महत्त्वाचे होते. दहशतवाद्यांनी आधीच या ठिकाणांची रेकी केली होती. डेव्हिड हेडली आणि त्याच्या सहकाऱ्यांनी त्यांना संपूर्ण माहिती पुरवली होती, परंतु, आमच्याकडे त्या वेळी ताज हॉटेलचा संपूर्ण आराखडादेखील उपलब्ध नव्हता. तो मिळवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून नकाशे मागवावे लागले.

ताज महाल पॅलेस हॉटेलमध्ये एक पोलीस आयुक्त होते. ट्रायडंटमध्ये दुसरे वरिष्ठ अधिकारी होते. कामा रुग्णालय



मृतदेहांनी भरले होते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला सर्वत्र गोळीबार सुरू झाला. नरिमन हाऊसची परिस्थिती वेगळी होती. एकूण नियंत्रण कोणाकडे आहे, हेच स्पष्ट नव्हते. त्यावेळी 'एटीएस'चे निरीक्षक एस. एल. अग्रवाल नियंत्रण कक्षात दूरध्वनी संदेश हाताळत होते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो. त्याकाळातील महाराष्ट्राच्या अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) या स्वतः ताज हॉटेलमध्ये उपस्थित होत्या. त्यांना यापूर्वी किनारपट्टीमार्गे संभाव्य दहशतवादी हल्ल्यांबाबत अनेक गुप्तचर अहवाल मिळाले होते. त्यांनी स्वतः कबूल केले आहे की, त्या पहाटे साधारण ३च्या सुमारास ताजमधून सुरक्षित बाहेर पडल्या. या घटनेचा उल्लेख मी माझ्या पुस्तकातही केला आहे. नंतर कर्नल पुरोहित प्रकरणात आहे. नंतर कर्नल पुरोहित प्रकरणात त्यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) न्यायालयात साक्ष दिली. त्या साक्षीत त्यांनी सांगितले की, त्यांनी अभियोजन मंजुरी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार दिली.

**स्मिता प्रकाश :** त्या ताजमध्ये होत्या, हा केवळ योगायोग होता, असे तुम्हाला वाटते?

**आर.व्ही.एस. मणी :** मी त्याबद्दल कोणताही निष्कर्ष काढत नाही. पण, त्या पहाटे ३ वाजता सर्वांत पहिले सुरक्षित बाहेर कशा आल्या, हा प्रश्न अनेकांनी विचारला आहे.

स्मिता प्रकाश : त्यावेळी दहशतवादी अजूनही हॉटेलमध्ये होते...

आर. व्ही. एस. मणी : होय, त्यांची कारवाई सुरूच होती. तरीही, त्या बाहेर पडल्या. माझ्या माहितीनुसार महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य सचिव यांनी वैयक्तिक पातळीवर नौदलातील 'मार्कोस कमांडो' दलाशी संपर्क साधला. त्यांच्या वैयक्तिक संबंधांमुळे काही कमांडो घटनास्थळी पोहोचले, मात्र त्यांना दहशतवाद्यांवर प्रतिहल्ला करण्याचे आदेश नव्हते. त्यांचे काम फक्त नुकसान कमी करणे आणि शक्य तितक्या लोकांना सुरक्षित बाहेर काढणे एवढेच होते.

**स्मिता प्रकाश :** तुम्ही अनेक मुलाखतींमध्ये असेही म्हटले आहे की, हा केवळ 'आयएसआय'चा कट नव्हता. भारतामधील काही लोकांनीही या कारवाईला मदत केली.

**आर.व्ही.एस. मणी :** होय, मी असेच म्हणतो. दहा दहशतवादी कुलाबा येथे उतरले, त्यानंतर कोळीवाडा परिसरातून चालत गेले. मुंबईतील त्या भागात संध्याकाळच्या वेळी प्रचंड गर्दी असते. स्थानिक कोळी समाजाचे कार्यक्रम सुरू असतात. अशा परिस्थितीत दहाजण मोठ्या शस्त्रांसह चालत जात असताना कुणाच्याही लक्षात न येणे, हे मला आजही प्रश्नचिन्ह वाटते. दुसरा प्रश्न म्हणजे, जेव्हा ते बढवार पार्कमध्ये उतरले, तेव्हा त्यांना वाहतूक कोणी उपलब्ध करून दिली? त्यांच्याकडे भारतीय चलन कोणी दिले? ओले कपडे बदलण्याची व्यवस्था कुठे झाली? मुंबईच्या वाहतुकीतून ते इतक्या अचूकपणे विविध ठिकाणी कसे पोहचले? त्यांना ताज, ट्रायडंट, नरिमन हाऊस आणि 'सीएसटी'कडे जाणारे मार्ग कोणी दाखवले? मुंबईची सखोल माहिती त्यांना कोणी दिली? माझ्या मते, या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय संपूर्ण चित्र स्पष्ट होणार नाही.

२ मार्च २०१० रोजी संसदेत 'प्रश्न क्रमांक ७८'ला उत्तर देण्यात आले होते. त्या प्रश्नात विचारण्यात आले होते की, अजमल कसाबने चौकशीदरम्यान भारतातील कोणत्याही व्यक्तीकडून मदत मिळाल्याचे सांगितले होते का? सरकारचे उत्तर होते- होय, कसाबने भारतीय मदतीचा उल्लेख केला होता, मात्र, त्याच उत्तरात पुढे असेही म्हटले गेले की, तपास यंत्रणांना त्या दाव्याला पुष्टी देणारे कोणतेही पुरावे मिळाले नाहीत. माझा प्रश्न एवढाच आहे- इतर अनेक प्रकरणांमध्ये सरकार असे सांगत असे की, तपास हा राज्य सरकारचा विषय आहे. मग या प्रकरणात मात्र केंद्र सरकारने स्वतः हून इतक्या ठामपणे भारतीय सहभाग नसल्याचे का सांगितले?

**स्मिता प्रकाश :** तुमच्या मते, त्यावेळी राजकीय नेतृत्वाला नेमका काय फायदा झाला असता?

**आर.व्ही.एस. मणी :** संपूर्ण कथानक '२६/११' हा 'हिंदू दहशतवादी हल्ला' म्हणून मांडण्याचा प्रयत्न सुरू होता. कसाबच्या हातात बांधलेला कलावा त्याचाच एक भाग होता. जर साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे यांनी कसाबला जिवंत पकडले नसते किंवा त्याच ठिकाणी तो ठार झाला असता, तर आज इतिहास पूर्णपणे वेगळा असता. '२६/११' हा 'हिंदू दहशतवादी हल्ला' म्हणून मांडण्याचा प्रयत्न झाला असता.

३० डिसेंबर २००८ रोजी मला पळवून नेण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती मेला




गुप्तचर विभागाकडून मिळाली. यासंदर्भात गृहमंत्रालयाच्या विशेष सचिवांनी दिल्ली पोलिसांकडे अधिकृत तक्रारही केली होती. सुमारे सहा महिन्यांनंतर दिल्ली पोलिसांनी उत्तर दिले. त्यात त्यांनी अत्यंत सर्वसाधारण भाषेत हा प्रयत्न झाल्याचे नमूद केले; पण पुढील तपासाबद्दल कोणतीही ठोस माहिती दिली नाही. नंतर काही पोलीस अधिकारी आणि गुप्तचर विभागातील एका अधिकाऱ्याने मला सांगितले- हा विषय आता पुढे संभाव्य नेऊ नका. प्रयत्न अयशस्वी झाला. प्रकरण संपले. मला सांगण्यात आले की, माझे अपहरण करून माझी कसाबसोबत अदलाबदल करण्याचा विचार होता. त्याबाबत मला संपूर्ण माहिती देण्यात आली नव्हती. फक्त एवढे सांगण्यात आले की, माध्यम क्षेत्रातील एका व्यक्तीचा त्यात संबंध असू शकतो. त्यापेक्षा अधिक माहिती माझ्याकडे नव्हती. त्या काळात अजून पाकिस्तानने अधिकृतरीत्या कसाब हा पाकिस्तानी नागरिक असल्याचे मान्य केले नव्हते. जर माझे अपहरण झाले असते, तर परिस्थिती वेगळ्या दिशेने वळवली गेली असती. कसाब पाकिस्तानी आहे, हे उघड होण्याआधीच अनेक गोष्टी बदलल्या गेल्या असत्या, मात्र सुदैवाने मी त्या दिवशी बचावलो.

**स्मिता प्रकाश :** त्या दिवशी नेमके काय घडले? तुम्ही नवीन कार घेतली होती.

**आर.व्ही.एस. मणी :** दि. २५ डिसेंबर २००८ रोजी मी नवीन कार घेतली होती. मी नेहमीप्रमाणे कार्यालयात होतो. त्याकाळात आम्ही कायदा मंत्रालयाशी संबंधित काम करत होतो. त्या दिवशी मी प्रथम 'नॉर्थ ब्लॉक'मध्ये गेलो. तेथून काही अधिकृत कागदपत्रे एका अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली. माझ्यासोबत कायदा मंत्रालयातील अधिकारीही होता. मी त्याला त्याच्या घरी सोडले. त्यानंतर मी यू-टर्न घेऊन माझ्या घरी परत निघालो. तेव्हाच चार मोटारसायकलींवर आलेल्या काही व्यक्तींनी माझा पाठलाग सुरू केला. ते वारंवार माझ्या कारसमोर येत होते. कधी उजवीकडून, कधी डावीकडून, तर कधी अचानक समोर येत होते. मला परिस्थिती संशयास्पद वाटू लागली. मी जवळच्या एका पोलीस चौकीकडे कार वळवली. त्यावेळी त्याठिकाणी तात्पुरती पोलीस चौकी होती, पण मी तिथे पोहोचलो, तेव्हा चौकी पूर्णपणे रिकामी होती. एकही पोलीस कर्मचारी तेथे उपस्थित नव्हता. यानंतर मी दिल्लीतील मागच्या रस्त्यांचा वापर करून शक्य तितक्या वेगाने गाडी चालवली. शेवटी मी माझ्या निवासी संकुलात सुरक्षित पोहोचलो. नंतर दिल्ली पोलिसांच्या पत्रातूनही हे स्पष्ट झाले की, त्यावेळी संबंधित पोलीस चौकीत कोणीही उपस्थित नव्हते.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे, जर तुम्ही थेट एखाद्या पोलीस ठाण्यात गेले असता, तरीही मदत मिळाली नसती?

**आर.व्ही.एस. मणी :** अगदी तसेच. माझ्या मते, त्या परिसरातील पोलीस यंत्रणा त्यावेळी प्रभावीपणे कार्यरत नव्हती. त्या मोटरसायकलींपैकी दोनवेळा एक वाहन माझ्या कारवर आदळण्याच्या अगदी जवळ आले होते. कसेबसे मी कार वाचवली. **(क्रमशः)**

# सफाई अपनाओ, बिमारी भगाओ आणि कॅच द रेन अभियानांतर्गत व्यापक मोहिमा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६मध्ये लोकसहभागावर भर देत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत आयुक्त डॉ.कैलास शिंदे साहेब यांच्या निर्देशानुसार स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत विशेष सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.




यामध्ये सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानांतर्गत स्वच्छ भारत मिशनच्या वतीने देण्यात आलेल्या रूपरेषेनुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रेल्वे स्टेशन, सिटीयु परिसर, सायन पनवेल हायवे, झोपडपट्टी, गाव/गावठाण क्षेत्र, तलाव व खाडी किनारे, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये आणि इमारतींमागील बॅक लेन या भागांच्या स्वच्छतेकडे प्राधान्याने लक्ष केंद्रीत करून विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.

यास अनुसरून ऐरोली, दिघा, तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात तसेच बिंदू माधव नगर, कृष्णा वाडी या भागात स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन घनकचरा व्यवस्थापन विभाग व आरोग्य विभाग यांच्या वतीने संयुक्त मोहिमा राबविण्यात आल्या. यामध्ये झोपडपट्टी व गावठाण भागात सखोल साफसफाई करण्यात आली व त्यासोबतच पाणी साचणाऱ्या संभाव्य ठिकाणांचा शोध घेऊन त्याठिकाणी डास प्रतिबंधात्मक फवारणी करण्यात आली.

स्वच्छता कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग असावा व त्यांच्यावर स्वच्छतेचे संस्कार व्हावे यादृष्टीने बेलापूर येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरींग कॉलेज येथे विद्यार्थ्यांमध्ये कचऱ्याचे ४ प्रकारे वर्गीकरण, प्लास्टीक बंदी, साथरोग इ. बाबत जनजागृती करण्यात आली.

त्याचप्रमाणे कोपरखैरणे विभागातील शकुंतला को. ऑप. सोसायटी व नमुंमपा शाळा कोपरखैरणे येथे 'कॅच द रेन' या उपक्रमांतर्गत कोपरखैरणे येथे रेन वॉटर हार्वेस्टिंग, कचरा वर्गीकरण, प्लास्टीक बंदी, साथरोग इ. बाबत जनजागृती करण्यात आली. यामध्ये विभागातील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक आणि स्वच्छता दूत सहभागी होते.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकाम तोडक मोहीम



**नवी मुंबईः बातमीदार**

आयुक्त नमुंमपा यांच्याआदेशान्वये मा.अतिरिक्त आयुक्त व उपआयुक्त (अतिक्रमण) यांच्या मार्गदर्शनखाली व मा.साधना पाटील, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी-विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत संजयकुमार दुबे, प्रतिभाकुमारी, संतोष हळसे (ठेकेदार) यांनी प्लॉट नं-११८,११९,१२०, से-२बी, ऐरोली, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

नवी मुंबई येथे केलेल्या अनधिकृत बांधकामास जी-विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये दि. २१ जानेवारी २०२६ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी, मजूर १८, ब्रेकर-२, घन-२, गॅसकटर-१, जनरेटर- ०२ तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते.

# अस्मिता साहित्य संस्कृती आणि कला मंडळाचा प्रथम वर्धापन दिन जल्लोषात

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

अस्मिता साहित्य संस्कृती आणि कला मंडळ, नवी मुंबई यांच्या वतीने वाशी येथील दैवज्ञ भवन हॉलमध्ये रविवारी प्रथम वर्धापन दिन, अस्मिता प्रकाशनाचे उद्घाटन, लेखिका सुचिता खाडे यांच्या 'एका वादळाची सांगता' या कथासंग्रहाचे प्रकाशन, आर्तता' प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन, राज्यस्तरीय निबंध आणि काव्यलेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण, तसेच निमंत्रितांचे काव्यसंमेलन असा बहुरंगी साहित्यिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला संमेलनाध्यक्ष श्रीहरी पवळे, सुप्रसिद्ध रांगोळीकार, बाल नाटककार, नेपथ्यकार, उद्घाटक डॉ. शरद गोरे (राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद), विशेष अतिथी किरण येले (कवी), प्रमुख अतिथी भारती सहस्त्रबुद्धे (एबीपी माझा) आणि वैभव व्हाडी (आरजे), दिलीप जांभळे, न्यू मॉडर्न स्कूलचे प्राचार्य बसवराज लचाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

हा कार्यक्रम तीन सत्रात पार पडला. संगीत विशारद विशाल राजगुरू यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष श्रीहरी पवळे यांनी अध्यक्षीय भाषणात संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेत उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

मंडळाचे कार्यकारिणी सदस्य, अनिल सोनवणे (सचिव), पुजाली शिंदे (खजिनदार), पवन इंगोले, वैशाली घनाते, संपदा जाधव, श्वेता मांदाडकर, परेश पवार, सुरेखा बागडे, अनुराधा कुरणे, गायत्री चिपळूणकर आणि इतर सर्व सदस्यांचा सन्मान करण्यात आला.



आंतरराष्ट्रीय कांदळवन संवर्धनदिनी

# करावे जेटीतून दीड टन कचरा काढला बाहेर

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय कांदळवन संवर्धन दिनाचे औचित्य साधून एन्व्हायर्नमेंट लाईफ फाउंडेशनतर्फे करावे जेटी, नवी मुंबई येथे ३१० व्या आठवड्याची कांदळवन स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. ही मोहीम डब्ल्यूडब्ल्यूएफ इंडिया - मॅन्ग्रोव्ह मित्र, मोंग्रोव फेस्टिवल यांच्या संयुक्त विद्यमाने, रोटरी क्लब्स ऑफ नवी मुंबई यांच्या सहकार्याने आणि कांदळवन प्रतिष्ठाण व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या पाठिंब्याने पार पडली.

या मोहिमेत नवी मुंबई, मुंबई, रायगड आणि ठाणे परिसरातून ७ ते ६५ वयोगटातील २०० हून अधिक स्वयंसेवक एकत्र आले होते. कांदळवनाच्या मुळांमध्ये अडकलेला तब्बल १.५ टन शहरी कचरा सर्वांनी मिळून बाहेर काढला. यामध्ये प्लास्टिक पॅकेजिंग, वैद्यकीय कचरा, प्रसाधने, बूट-चप्पल, शाळेचे दप्तर आणि थर्माकोल यांसारख्या वस्तूंचा समावेश होता, जो शहरांमधील नाले आणि नद्यांद्वारे कांदळवनात वाहून येतो.

सकाळी ७:०० वाजता एका प्रबोधनात्मक सत्राने मोहिमेची सुरुवात झाली, ज्यामध्ये कांदळवन ही किनारपट्टीचे संरक्षण करणारी आणि हवामान बदलाशी लढणारी नैसर्गिक ढाल कशी आहे, हे समजावून सांगण्यात आले. मात्र, या संपूर्ण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांच्या सवयींवर थेट बोट ठेवणे हा होता.

नागरिकांना थेट आणि कडक शब्दांत आवाहन करताना एन्व्हायर्नमेंट लाईफ फाउंडेशनचे संस्थापक धर्मेश बरई म्हणाले:"आज आपण जो कचरा काढला आहे, तो आपल्या समुद्रकिनाऱ्यांवर साचलेल्या एकूण कचऱ्याचा अगदी छोटासा भाग आहे. खरं तर अशा स्वच्छता मोहिमा आयोजित करण्याची गरजच पडायला नको

या मोहिमा आपल्या नागरिकांच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहेत. जर नागरिकांनी उघड्यावर कचरा टाकणे बंद केले, तर आपले निसर्ग आणि कांदळवन स्वतःहून पुनरुज्जीवित होतील आणि २४ तास मोफत आपले रक्षण करतील. देश स्वच्छ आणि सुंदर ठेवायचा असेल, तर कचरा फेकणारे कमी आणि कचरा उचलणारे जास्त असायला हवेतयावर शासनापेक्षा नागरिकांनीच जास्त विचार करण्याची गरज आहे.

. वैयक्तिक निष्काळजीपणा साफ करण्यासाठी पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहणे थांबवा. आपल्या तरुण पिढीची ऊर्जा, वेळ आणि पर्यावरण वाचवण्यासाठी फक्त सवयींमध्ये छोटासा बदल करण्याची गरज आहे." यावेळी रोटरी क्लब्स ऑफ नवी मुंबईचे केदारनाथ घोरपडे म्हणाले:"आम्ही मानव म्हणूनकांदळवनांसह निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आपण निर्माण केलेल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याची सामूहिक जबाबदारी आपली स्वतःची आहे."

मोहिमेची सांगता उघड्यावर कचरा न टाकणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि नागरी जबाबदारीचा प्रचार करण्याची शपथ घेऊन झाली. आयोजकांनी सर्व मॅन्ग्रोव्ह सोल्जर्स, रोटेरियन्स, विद्यार्थी, नागरिक आणि मॅन्ग्रोव्ह मित्रांचे कांदळवन अधिवास पूर्ववत करण्यासाठी दिलेल्या स्वार्थरहित योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

# कर्ज-वीजबिलमाफीमुळे शेतकऱ्यांना दिलासा

## राज्य सरकारच्या निर्णयाचे भाजपकडून स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना तसेच शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीजबिल थकबाकी माफ करण्याच्या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. याबाबतची माहिती अलिबाग येथे पत्रकार परिषदेत भाजप नेत्यांकडून देण्यात आली.

या पत्रकार परिषदेस आमदार विक्रांत पाटील, भाजप नेते सतीश धारप, दक्षिण जिल्हाध्यक्ष माजी खासदार धैर्यशील पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, रोहा तालुकाध्यक्ष महेश घाग यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.




राज्य सरकारच्या योजनेंतर्गत राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमाफी योजनेतील मर्यादा आणि अटी हटविण्यात आल्याने अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळेल तसेच नियमित कर्जफेडीसंदर्भातील अटीही शिथिल करण्यात आल्याने कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही.

याशिवाय राज्यातील शेतकऱ्यांच्या सुमारे ४८ हजार कोटी रुपयांच्या वीजबिल थकबाकीची जबाबदारीही सरकारने स्वीकारली असून त्यामुळे लाखो शेतकऱ्यांच्या थकीत वीजबिलाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे.

शेतीसाठी राज्य सरकार दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत देत असून सिंचन, सौर ऊर्जा, शेततळे, जलयुक्त शिवार, गटशेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.

राज्य सरकारचे हे निर्णय शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून त्यामुळे शेती क्षेत्राला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

# माथेरान घाटरस्त्यावर महाकाय दगड कोसळला

## पर्यटकांची गर्दी नसल्याने अनर्थ टळला

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानच्या घाटरस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास भला मोठा दगड कोसळल्याची घटना घडली. वॉटर पाईप स्टेशनच्या खालील वळणावर पिटकर पॉईंटच्या खालच्या बाजूस असलेल्या धबधब्याजवळ काही अंतरावर मोठा दगड रस्त्यावर कोसळला. सुदैवाने ही घटना रात्रीच्या वेळी घडल्याने त्यावेळी घाटरस्त्यावर वाहनांची वर्दळ कमी होती. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.



रविवार आणि वीकेंडची सुट्टी असल्याने माथेरानमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी होती. रस्त्याकडील धबधबे आणि निसर्गरम्य ठिकाणांचा आनंद घेण्यासाठी दिवसभर पर्यटक घाटरस्त्यावरून मोठ्या संख्येने प्रवास करतात. हीच घटना रात्रीऐवजी दिवसा घडली असती तर एखादे वाहन, प्रवासी किंवा पर्यटक या महाकाय दगडाच्या तडाख्यात सापडून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. रात्रीच्या अंधारात ही घटना घडल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली, अशी प्रतिक्रिया स्थानिक वाहनचालक आणि प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, माथेरान घाटातील डोंगर उतारावर अनेक ठिकाणी मोठे दगड खाली कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने दरडी आणि दगड कोसळण्याचा धोका आणखी वाढला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने माथेरान घाटरस्त्याची तातडीने पाहणी करून धोकादायक दगड आणि दरडी हटवाव्यात, अशी मागणी होत आहे.

# रोटरी क्लबतर्फे खोपोलीत आशा वर्कर्स महिलांसाठी प्रशिक्षण शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोली, पनवेल महानगर आणि पनवेल मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथील क्लबच्या हॉलमध्ये नुकतेच आशा वर्कर्स महिलांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास महिलावर्गाचा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खालापूर तालुका पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी इंगोले, रोटरी जिल्हा मेडिकल डायरेक्टर डॉ. स्वाती लिखिते, डॉ. शोभना पालेकर, डॉ. चित्रा कुलकर्णी, डॉ. शिल्पा नांबियार गांधी, एजी रेश्मा कुरूप आदी उपस्थित होते.

आशा वर्कर्स यांच्यासाठी प्रेगन्सी व न्यूट्रीशन्स, फिडिंगचे महत्त्व, व्हॅक्सीनची उपयुक्तता, लहान बालकांच्या वाढीवरील मॉनेटरिंग या विषयांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी व्याख्याने आयोजित केली होती. या सेमिनारमधे आशा वर्कर्स, प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स, नर्सेस आशा ६० महिलांनी सहभाग घेतला.

डिस्ट्रिक्ट को आर्डिनेटर ध्वनी तन्ना यांनी सहज सोप्या, प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आशा वर्कर्स यांना बोलते करून मार्गदर्शन केले. आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी इंगोले यांनी मोलाचे सहकार्य करीत आशा वर्कर्स, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर्स, नर्सेस यांना कार्यक्रमाला पाठविले. व स्वतः कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

शेवटी रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या वतीने पाच केंद्रांना ऑक्सीमीटर आणि बीपी ॲपरेटर मशिन्स खालापूर नगरपंचायत, खोपोली, ताकई, महड, हाळ प्राथमिक आरोग्य केंद्रांना मोफत वाटण्यात आल्या. या मशिनसाठी रोटरी क्लब खोपोलीचे डॉ. रवींद्र टिळक यांनी आर्थिक सहकार्य केले. रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरचे प्रेसिडेंट भगीरथ व त्यांचे सदस्य, मिडटाऊनचे प्रेसिडेंट प्रशांत माने व त्यांचे सदस्य, रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या प्रेसिडेंट कविता खोपकर व त्यांचे मेंबर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सेवानिवृत्त संघटनेच्या सभेत विविध विषयांवर चर्चा



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका सेवानिवृत्त संघटनेची सभा नुकतीच संघटनेचे अध्यक्ष अनंत वारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली.

या सभेस संघटनेचे पदाधिकारी व सभासद भानू मंचेकर, दीपक ठाकूर, मारोती शिर्के, जनाबाई पाटील, बाळाराम चव्हाण, पद्मा गाडगीळ, जनार्दन वडके, मनोहर चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी सभेत प्रथम विविध प्रलंबित प्रस्ताव, परिपत्रके वाचन व ते प्रश्न सोडविणे तसेच विविध विषयांतर चर्चा करण्यात आली. विशेष असा घटनेच्या माध्यमातून उपक्रमांतर्गत संघटनेचे सदस्य बाळाराम चव्हाण, तुकाराम बांद्रे आदींसह वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. संघटनेच्या माध्यमातून होणाऱ्या कामांबाबत चर्चा करून सभासदांच्या असणाऱ्या अडीअडचणींवर चर्चा होऊन त्या सर्वतोपरी सोडविण्यात येतील व कोणतेही काम मागे राहणार नाही, असे अध्यक्षांनी सूचित केले आहे.

# मुरूडमध्ये पाककला स्पर्धा ; महिलांचा प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्याच्या महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या सहकार्यातून मुरुड शहरात पाककला स्पर्धेचे आयोजन वसंतराव नाईक महाविद्यालयातील हॉलमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण ७५ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेत महिलांनी विविध पदार्थ बनवून आणले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून शिल्पा पाटील व रिद्धी वाडेकर यांनी काम पाहिले. परीक्षकांनी प्रत्येक स्टॉलवर जाऊन महिलांनी बनवलेल्या विविध पदार्थांची चव घेऊन त्यांना नंबर घोषित केले. प्रथम क्रमांक स्वरा प्रचित मसाल (आठ हजार रुपये व प्रमाणपत्र), द्वितीय गीता राजाराम ठाकूर (पाच हजार रोख व प्रमाणपत्र), तृतीय सुचिता शैलेंद्र पोतनीस (तीन हजार व प्रमाणपत्र), चतुर्थ रोशनी सुमित सद्रे आणि पाचवा क्रमांक सारिका आशिष देसाई (प्रत्येकी दोन हजार व प्रमाणपत्र) यांनी पटकाविला. स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेस आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरणास मुरूड महिला राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष ॲड. मृणाल खोत, नगराध्यक्ष आराधना दांडेकर, अल्पसंख्याक महिला तालुकाध्यक्ष मुसरत उलडे, माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार, शहराध्यक्ष शितल घरत, नरसेविका प्रमिला माळी, प्रांजली मकु, ज्येष्ठ नेत्या वासंती उमरोटकर, तरन्नूम फराश, वैशाली रणदिवे, सरचिटणीस विजय पैर, माजी सरपंच अजित कासार, जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन आदी उपस्थित होते. स्पर्धेस चांगला प्रतिसाद लाभला.



# केएमसी कॉलेजमध्ये पोस्टर स्पर्धा

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र गर्ल्स बटालियन अंतर्गत केएमसी कॉलेज, खोपोली येथील एनसीसी विभागाच्या वतीने जनजागृतीपर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध सामाजिक विषयांवर पोस्टर्स सादर केली.

कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी अधिकारी कॅप्टन शीतल कृष्णा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद वझाळ, उपप्राचार्य सूर्यवंशी, नागरगोजे, ननावरे सर तसेच इतर प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

स्पर्धेतील पोस्टर्सचे परीक्षण प्राचार्य, उपप्राचार्य, सूर्यवंशी, नागरगोजे आणि ननावरे यांनी केले. त्यांच्या निर्णयानुसार कॅडेट मोहिनी घार (अल्फा कंपनी) हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर एलसीपीएल शालिनी पवार (ब्रावो कंपनी) हिने द्वितीय क्रमांक मिळविला. विजेत्या कॅडेट्सना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि सामाजिक जाणीवेचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्व, लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



# अनुसूचित जमातीच्या बांधवांना जातीचे दाखले मिळण्यासाठी कमिटी ; मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**मुरूड : प्रतिनिधी**

अनुसूचित जमातीतील बांधवांना जातीचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळणे व रक्त नात्यातील समाजबांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषांगाने अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. याचा शासकीय अध्यादेश निर्गमित झाल्याने अनुसूचित जमातीमधील बांधवांना मोठा दिलासा प्राप्त झाला आहे.

कोळी महासंघाच्या वतीने तसेच इतर अन्यायग्रस्त जमातीच्या संघटना यांच्या वतीने काही दिवसांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्रात कोळी महासंघाच्या वतीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीतील प्रोसिंडिंगनुसार शासन आणि प्रशासन यांनी तातडीने निर्णय घ्यावा, असे निवेदन देण्यात आले होते. याची दखल खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन त्यांच्याच मान्यतेने ही समिती गठीत करण्यात आलेली आहे.



कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांचे मार्गदर्शन आणि ॲड. चेतन पाटील यांच्या पाठपुरावा, प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून अनुसूचित प्रवर्गातील बांधवांना आता न्याय मिळणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानण्यात आले.

# वारकऱ्याचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराच्या जवळ असणाऱ्या धाकटी पंढरी येथील श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या अंबाजी वाघमारे रा. सांगडे, ता. खालापूर) या वारकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर येत आहे.

अंबाजी वाघमारे यांना दर्शन घेताना चक्कर आली. त्यांना रुग्णवाहिकेतून खोपोली येथील रुग्णालयात आणले असता उपचार सुरू असताना उपस्थित डॉक्टरांनी मृत घोषित केले. आषाढी एकादशीच्या दिवशी झालेल्या या घटनेने समस्त वारकरी हळहळले.

# रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडला संकुलातील विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप

**रेवदंडा प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडला संकुलातील विद्यार्थ्यांना पावसाळ्यात सुरक्षितपणे शाळेत ये–जा करता यावी, या सामाजिक भावनेतून मांडला रोहिदासवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप लक्ष्मण रोहेकर, त्यांच्या पत्नी निकिता रोहेकर आणि चिरंजीव संस्कृत रोहेकर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना पावसाळी रेनकोटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत मराठी माध्यम अंगणवाडी, उर्दू माध्यम अंगणवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा तसेच जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, मांडला येथील सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास ॲड. सुरेश नांदगावकर, प्रदीप जाधव, मांडला सदस्य दिशा ग्रामपंचायत नांदगावकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष अपर्णा नागावकर, उपाध्यक्ष अर्चना मुरुडकर, तसेच मुरूड तालुका पंचायत समितीचे शिक्षण वरिष्ठ विस्तार अधिकारी तथा मांडला केंद्रप्रमुख सुनील पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शर्मिला धनखड सुवर्णपदकाची मानकरी

## कॉमनवेल्थ पॅरा ॲथलेटिक्समध्ये दमदार गोळाफेक




**ग्लासगो : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत पदकांची लय कायम राखली आहे. स्पर्धेच्या पाचव्या दिवशी भारताने ॲथलेटिक्स आणि पॅरा ॲथलेटिक्समध्ये एकाच दिवशी सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई करत इतिहास रचला.

हरियाणाची ४० वर्षीय शर्मिला धनखड हिने पॅरा शॉटपुट स्पर्धेत ९.८१ मीटर गोळाफेक करत सुवर्णपदक पटकावले. तिचा हा विजय केवळ क्रीडा यश नाही, तर संघर्षावर मात करून मिळवलेले प्रेरणादायी यश ठरले आहे. घरगुती हिंसाचार, पतीपासून विभक्त होणे, आर्थिक अडचणी आणि सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी, आया तसेच शेतमजुरी अशी विविध कामे करत शर्मिलाने आयुष्याशी दोन हात केले. अवघ्या सहा वर्षांत तिने स्वतःला आंतरराष्ट्रीय दर्जाची खेळाडू बनवत सुवर्णपदकावर नाव कोरले.

याच पॅरा शॉटपुट स्पर्धेत कर्नाटकच्या शिल्पा शायला हिने ७.२६ मीटर गोळाफेक करत कांस्यपदक जिंकले. विशेष म्हणजे, राष्ट्रकुल स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच एका पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताने पोडियमवरील दोन स्थानांवर कब्जा केला.

ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या आणि अजया यांनीही सर्वेश उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदके पटकावली. त्यांच्या दमदार प्रदर्शनामुळे भारताच्या पदकसंख्येत मोठी भर पडली.

शर्मिला धनखड यांचा जन्म १५ ऑगस्ट १९८६ रोजी हरियाणातील रेवाडी येथे झाला. दोन वर्षांच्या असताना पोलिओमुळे त्यांचा डावा पाय बाधित झाला होता. त्यामुळे त्यांचा संघर्ष लहानपणापासूनच सुरू झाला. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या शर्मिला यांना लहानपणीच मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. लग्नानंतर हुंड्यासाठी पतीकडून छळ आणि घरगुती हिंसाचारामुळे त्यांचे जगणे आणखी कठीण झाले. त्यांना व दोन मुलींना पतीने घराबाहेर काढले, पण त्यांनी हार मानली नाही. आपला संघर्ष सुरूच ठेवला.

पहिल्या पतीने सोडल्यानंतर त्यांच्या आयुष्यात अजित सिंग यांची एन्ट्री झाली. अजित यांनी आयुष्याच्या प्रत्येक वळणावर शर्मिला यांना साथ दिली. वयाच्या ३४व्या वर्षी पॅरा ॲथलेटिक्स खेळायला सुरुवात करणाऱ्या शर्मिला यांनी आता २०२६ कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहासाला गवसणी घातली आहे.

# श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

### रवींद्र जडेजाचे कमबॅक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येत्या ऑगस्ट महिन्यात भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यावर जाणार असून तिथे दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआय भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मंगळवारी (दि. २८) १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. युवा फलंदाज शुबमन गिलकडे संघाच्या कर्णधारपदाची सूत्रे सोपवण्यात आली असून अनुभवी केएल राहुल उपकर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळेल. अष्टपैलू रवींद्र जडेजाचे संघात पुनरागमन झाले आहे.

दरम्यान, बीसीसीआयने आपल्या अधिकृत निवेदनात स्पष्ट केले आहे की, वॉशिंग्टन सुंदर हा पहिल्या कसोटी सामन्यातील निवडीसाठी उपलब्ध नव्हता. जसप्रीत बुमराह आणि साई सुदर्शन यांची मालिकेतील उपलब्धता सेंटर ऑफ एक्सीलेंसकडून मिळणाऱ्या फिटनेस क्लिअरन्सवर अवलंबून असेल.

दरम्यान, भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला १५ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. हा सामना गॉल आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. त्यानंतर या मालिकेतील दुसरा आणि शेवटचा सामना २३ ऑगस्ट ते २७ ऑगस्टदरम्यान सिंहली स्पोर्ट्स क्लब क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे.

**संघ :** शुभमन गिल (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत (विकेटकीपर), ध्रुव जुरेल (विकेटकीपर), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुतार, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार, देवदत्त पडिक्कल, सारांश जैन, जसप्रीत बुमराह, साई सुदर्शन.

# नाशिकच्या सर्वेश कुशारेला उंच उडीत रौप्यपदक



**ग्लासगो : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्समध्ये नाशिकच्या सर्वेश कुशारे याने उंच उडीत चमकदार कामगिरी करत रौप्यपदक जिंकले आहे. सर्वेश हा भारताच्या या स्पर्धेतील इतिहासात उंच उडीत रौप्यपदक जिंकणार पहिलाच खेळाडू ठरला आहे.

भारतासाठी पुरुषांच्या उंच उडीमध्ये चार वर्षांपूर्वी तेजस्विन शंकरने पदक जिंकले होते. त्याने बर्मिंघम २०२२ कॉमनवेल्थ गेम्समध्ये कांस्यपदक जिंकले होते. सर्वेशने २.२५ मीटर उडी मारत रौप्यपदकाची कमाई केली आहे.

सर्वेश कुशारेचा जन्म १७ जून १९९५ रोजी नाशिक जिल्ह्यातील देवगावमध्ये झाला. त्याला शाळेत असतानाच उंच उडीची आवड होती. सर्वेश २०१६मध्ये इंडियन आर्मीमध्ये दाखल झाला. त्याला नायब सुभेदार नियुक्त करण्यात आले. त्यानंतर त्याने आपल्या उंच उडीची आवड कायम ठेवत वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेतला.

ग्रामीण भागात उंच उडीसारख्या क्रीडा प्रकाराची साधने मिळणे अपवादात्मकच. त्यामुळे सर्वेशच्या सरावावर मर्यादा येत होत्या. त्यावर उपाय म्हणून त्याचे प्रशिक्षक जाधव यांनी एक गावठी जुगाड केला. त्यांनी सर्वेशच्या वडिलांच्या मदतीने मक्याचा भुस्सा, जुने कपडे आणि कापूस यांचा वापर करून एक कामचलाऊ उडी मारण्याची गादी तयार केली. त्या गादीवरच जाधव सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेश जोरदार सराव करू लागला आणि हळूहळू त्याला कष्टाचे फळ मिळण्यास सुरुवात झाली.

# खराब क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूंना संघाबाहेर करा

## गावसकरांचा ‘स्ट्रेट ड्राईव्ह’

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये तीन टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये भारतीय गोलंदाज आणि फलंदाजांनी दमदार कामगिरी केली. या कामगिरीच्या बळावर भारतीय संघाने ही मालिका ३-०ने आपल्या नावावर केली, पण भारतीय संघातील खेळाडू हवे ते क्षेत्ररक्षण करू शकले नाहीत. भारतीय खेळाडूंच्या क्षेत्ररक्षणावरून भारतीय संघाचे माजी खेळाडू सुनील गावसकर यांनी जोरदार टीका केली आहे.



सुनील गावसकर यांनी स्पोर्ट्सस्टारच्या कॉलममध्ये लिहिले की, जर एखादा खेळाडू सरासरी दर्जाचा क्षेत्ररक्षक असेल, तर त्याला संघाबाहेर करणे अत्यंत गरजेचे आहे. चेंडू त्यांच्याकडे जाणारच नाही, अशी अपेक्षा करून कर्णधाराने संघातील तीन किंवा चार खेळाडूंना मैदानात लपवून ठेवणे अजिबात योग्य नाही तसेच त्यांनी खेळाडूंच्या गेम अवेअरनेसवरूनही टीका केली.

भारतीय संघाला गेल्या काही सामन्यांमध्ये लाजिरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर गावसकरांनी लिहिले की, “योग्यवेळी योग्य शॉट मारणे खूप गरजेचे असते. अशावेळी फलंदाजाला आपल्या ईगोवर नियत्रंण ठेवावे लागत आणि चेंडूच्या गुणवत्तेनुसार खेळावे लागते. टी-२० फॉरमॅटमध्ये असे करणे मुळीच सोपे नसते, कारण या फॉरमॅटमध्ये प्रत्येक दुसऱ्या चेंडूवर मोठ्या फटक्याची गरज असते, मात्र वनडे फॉरमॅटमध्ये परिस्थिती वेगळी असते. या फॉरमॅटमध्ये मोठे फटके मारण्यापूर्वी मैदानात थोडे सेटल होण्यासाठी वेळ मिळतो.

यासह सुनील गावसकर यांनी बीसीसीआयला एक सल्ला देखील दिला आहे. त्यांनी बाऊंड्री साईज वाढवण्याचा सल्ला दिला आहे. २०२७चा वनडे वर्ल्डकप दक्षिण आफ्रिकेत होणार आहे. भारतीय खेळाडूंना मोठ्या मैदानांवर खेळण्याची सवय व्हावी म्हणून गावसकरांनी हा सल्ला दिला आहे.

# प्रथम श्रेणी क्रिकेट गाजवणारा सारांश जैन टीम इंडियात!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघाची घोषणा करण्यात आली असून संघात एका नव्या आणि अनपेक्षित नावाचा समावेश करण्यात आला आहे. शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळल्या जाणाऱ्या या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी मध्य प्रदेशचा ३३ वर्षीय अष्टपैलू खेळाडू सारांश जैन याला प्रथमच भारतीय संघात स्थान मिळाले.

वॉशिंग्टन सुंदरच्या जागी ऑफ-स्पिनर म्हणून सारांश जैनला संधी देण्यात आली. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या मालिकेसाठी निवड समितीने फिरकीपटूंवर अधिक भर दिला आहे.



इंदूरचा रहिवासी असलेला सारांश जैन हा भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधील एक अत्यंत यशस्वी आणि अनुभवी खेळाडू आहे. तो उजव्या हाताने ऑफ-ब्रेक गोलंदाजी करतो आणि खालच्या क्रमांकावर उपयुक्त फलंदाजी करण्यासाठी ओळखला जातो. आयपीएलच्या झगमगाटातून नव्हे, तर प्रथम श्रेणी क्रिकेटमधील खडतर परिश्रमाच्या जोरावर त्याने राष्ट्रीय संघात जागा मिळवली आहे. वयाच्या ३३व्या वर्षी सारांश जैनसाठी भारतीय संघाचे दरवाजे उघडले असून, कसोटी पदार्पणात तो कशी कामगिरी करतो याकडे सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

श्रीलंकेतील फिरकीला अनुकूल असणाऱ्या खेळपट्ट्या लक्षात घेता निवडकर्त्यांनी भारतीय संघात चार मुख्य फिरकीपटूंची निवड केली आहे. डावखुरा अष्टपैलू रवींद्र जडेजाचे संघात पुनरागमन झाले असून, त्याच्याच शैलीत गोलंदाजी करणारा मानव सुतारदेखील संघात आहे, तर चायनामन गोलंदाज कुलदीप यादव रिस्ट-स्पिनरची भूमिका सांभाळेल. वॉशिंग्टन सुंदरच्या अनुपस्थितीत संघात एका दर्जेदार ऑफ-स्पिनरची गरज होती, ती कमतरता सारांश जैन भरून काढेल अशी आशा आहे.

### अशी आहे कामगिरी

सारांश जैन याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. त्याने अवघ्या ५४ सामन्यातील ८५ डावामध्ये १८८ विकेट्स घेतल्या आहेत, तर ३१च्या सरासरीने दोन हजार २२३ धावा केल्या आहेत, ज्यात दोन शतक आणि १४ अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये ३८ आणि टी-२० क्रिकेटमध्ये १८ विकेट्स घेतल्या आहेत.

# बिंद्यारानीने पुन्हा एकदा दाखवली ‘ताकद’

## राष्ट्रकुल स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा पदक जिंकले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत वेटलिफ्टिंग या खेळात भारताने सर्वाधिक पदके जिंकली आहेत. या स्पर्धेत मणिपूरच्या बिंद्यारानी देवी सोरोखैबाम हिने वेटलिफ्टिंगमधील भारताचा दबदबा कायम राखत महिलांच्या ५८ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले. याआधी २०२२मध्ये बर्मिंगहॅम येथे झालेल्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये तिने ५५ किलोच्या गटात रौप्यपदक पटकाविले होते.




तत्पूर्वी युवा भारतीय वेटलिफ्टर ज्ञानेश्वरी यादवने महिलांच्या ५३ किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. 'खेलो इंडिया' योजनेतून उदयास आलेल्या या प्रतिभावान खेळाडूने एकूण १९९ किलो (स्नॅच ८८ किलो + क्लीन अँड जर्क १११ किलो) वजन उचलून केवळ रौप्यपदकच जिंकले नाही, तर एकूण वजन आणि क्लीन अँड जर्क या दोन्हीमध्ये वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीची नोंदही केली. भारतीय वेटलिफ्टिंग संघाने या राष्ट्रकुल खेळांमध्ये आतापर्यंत प्रभावी कामगिरी केली आहे. प्रारंभी मीराबाई चानूने सलग तिसऱ्यांदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला, तर राजा मुथुपांडी आणि ऋषिकांत सिंग यांनी रौप्यपदके पटकावली आहेत.

# ...अन् इशान किशनला हसू अनावर

**हरारे : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने १६ वर्षांनंतर झिम्बाब्वेला झिम्बाब्वेत खेळताना क्लीन स्वीप केले आहे. या मालिकेनंतर भारताचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनचा एक मजेशीर व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

इशान मैदानावर असताना आपल्या तुफान फटकेबाजीसाठी ओळखला जातो, पण मैदानाबाहेर तो आपल्या मजेशीर स्वभावासाठी ओळखला जातो. त्याचे मैदानाबाहेर मस्ती करतानाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात.

यावेळी त्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे, ज्यात तो चाहत्यांना ऑटोग्राफ



देताना दिसून येत आहे. एका चाहत्याने अशा ठिकाणी ऑटोग्राफ देण्याची मागणी केली, जे पाहून इशानलाही हसू आवरले नाही.

व्हिडीओत इशान आपल्या चाहत्यांना ऑटोग्राफ देताना दिसून येत आहे. त्याच वेळी एका चाहत्याने त्याच्या टक्कल असलेल्या डोक्यावर ऑटोग्राफ देण्याची मागणी केली. हे पाहून इशान आधी थक्क झाला आणि हसू लागला, पण चाहत्याने २-३ वेळा विनंती केली. या विनंतीला मान देऊन इशानने त्याला हसत हसत ऑटोग्राफ दिला. हा मजेशीर व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.

# वल्लुरी अजय बाबूला रौप्यपदक

**ग्लासगो :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत वडिलांचा वारसा जपत लेकाने रौप्यपदक पटकावत इतिहास रचला आहे. भारताचा २१ वर्षीय वेटलिफ्टर वल्लुरी अजय बाबू याने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६मध्ये पुरुषांच्या ७९ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले.

आंध्र प्रदेशातील विजयनगरम जिल्ह्यातील वल्लुरी श्रीनिवास राव यांनी २०१०मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. तब्बल १६ वर्षांनंतर मेडलचा रंग बदलत अजय बाबूने वडिलांचा वारसा जपला. त्याने स्नॅचमध्ये १४९ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये १८१ किलो वजन उचलत एकूण ३३० किलो वजनाची नोंद केली. विशेष म्हणजे, त्याने स्नॅच आणि एकूण वजन या दोन्ही प्रकारांत राष्ट्रकुल स्पर्धेचे नवे विक्रम प्रस्थापित केले, मात्र सुवर्णपदक त्याच्या हातून केवळ एका किलोच्या फरकाने निसटले.

# पाच निर्धाव षटकांत पाच विकेट्स!

## वेस्ट इंडिजच्या जस्टिन ग्रीव्सचा थरारक स्पेल



**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाज जस्टिन ग्रीव्सने इतिहास रचला. त्याने कसोटी इतिहासातील सर्वात थरारक स्पेलपैकी एक टाकून संपूर्ण सामन्याचे चित्र बदलून टाकले. ग्रीव्सने लागोपाठ पाच निर्धाव षटके टाकून पाच विकेट्स घेतल्या.

या सामन्याच्या सुरुवातीला जस्टिन ग्रीव्सच्या सहा ओव्हर्समध्ये २७ धावा देऊन शून्य विकेट्स होत्या. ग्रीव्हासने आपल्या सातव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर पहिली विकेट घेतली. त्यानंतर त्याने लागोपाठ चार षटकात पाच विकेट्स घेतल्या आणि या पाच षटकांच्या स्पेलमध्ये त्याने एकही रन दिला नाही. या पाचही ओव्हर्स त्याने 'मेडन' टाकल्या आणि प्रत्येक ओव्हरमध्ये त्याने एक विकेट घेतली. डावाच्या शेवटी ग्रीव्हासचा स्कोअर ११ ओव्हर्स, सहा मेडन, २७ रन आणि पाच विकेट असा झाला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com